


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ८२ * नांदेड * शनिवार, दि. २८ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# लॉकडाऊन लागणार नाही, फडणवीसांकडून स्पष्ट

## अफवा पसरविणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई



**मुंबई (प्रतिनिधी)**– देशात इंधनाचा तुटवडा असून लवकरच कोरोनाप्रमाणे लॉकडाऊन लागणार, अशा आशयाचे संदेश सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. त्यामुळे लोकांमध्ये अस्वस्थतेची स्थिती निर्माण झाल्याचं चित्र आहे. त्यावर आता राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. आपल्या देशात इंधनाचा पुरेसा साठा आहे, त्यामुळे कोणतेही संकट नाही. देशात कोणतेही लॉकडाऊन लागणार नाही, तशा आशयाच्या अफवा जर कुणी पसरवत असेल तर त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली, जाईल असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, देशात कोणताही लॉकडाऊन लागणार नाही, हे केंद्र सरकारने जाहीर केलं आहे. त्यामुळे या विषयी कोणतीही अफवा पसरविणाऱ्यांवर फौजदारी कारवाई केली जाईल. अशा प्रकारचे फेक व्हॉट्सअ‍ॅप मेसेज जरी फॉरवर्ड केली तरी तो गुन्हा ठरेल. त्यामुळे कुणीही खोट्या अफवा पसवरू नये, अन्यथा त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क हे १० रुपयांनी कमी केलं आहे. त्यामुळे कच्च्या तेलाचा वाढलेल्या किंमतीचा भार हा आता तेल कंपन्याच सहन करणार आहेत. त्यामुळे सामान्य लोकांना अधिकच्या दरात पेट्रोल डिझेलची खरेदी करावी लागणार नाही, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

भारताच्या आजूबाजूच्या देशांमध्ये जवळपास शट डाऊनची परिस्थिती आली आहे. अशा वेळी भारतात मात्र घरगुती गॅसची कोणतीही कमतरता भासत नाही. त्यामुळे अफवेच्या आधारावर ग्राहकांनी पेट्रोल-डिझेलसाठी रांगा लावू नयेत. आपल्याकडे एक महिना चालेल इतका पेट्रोल आणि डिझेलचा साठा आहे, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

केंद्र सरकारने आखाती संकट काळात मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने पेट्रोल, डिझेलवरील एक्साईज ड्युटी कमी केली आहे. पेट्रोल, डिझेलवरील उत्पादन शुल्कात १० रूपयांची घट करण्यात आली आहे. पेट्रोलवरील उत्पादन शुल्क १३ रूपयांवरून ३ रूपयांवर आणण्यात आला आहे. तर डिझेलवरील उत्पादन शुल्क १० रूपयांवरून शून्यावर आणला आहे. इंधन दरवाढीची शक्यता लक्षात घेत उत्पादन शुल्कात कपात करण्यात आली आहे.

दरम्यान, यावर केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांनीही लॉकडाऊनच्या अफवांवर विश्वास ठेऊ नका असं नागरिकांना आवाहन केलं आहे. देशात लॉकडाऊन लावण्याचा सरकारचा कोणताही इरादा नाही असं त्यांनी स्पष्ट केलं. तसंच युद्धासारख्या संकट काळात संयम बाळगणं महत्त्वाचं असून अफवा पसरवणं देशासाठी धोक्याचं ठरेल अशी चिंताही त्यांनी व्यक्त केली.

# नागरिकांनी पेट्रोल-डिझेलचा अतिरिक्त साठा टाळावा -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## पेट्रोलपंपधारकांची बैठक; जिल्ह्यात पुरेसा इंधन साठा उपलब्ध असल्याची माहिती

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील नागरिकांनी पेट्रोल व डिझेलची पॅनिक खरेदी करू नये तसेच अतिरिक्त साठा करणे टाळावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी जिल्ह्यातील सर्व पेट्रोलपंपधारकांची बैठक पार पडली.



या बैठकीला अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ. जगदीश बारदेवाड तसेच विविध पेट्रोलपंप मालक उपस्थित होते. यावेळी पेट्रोलपंपधारकांनी मांडलेल्या अडचणींचे निराकरण करण्यात आले.

जिल्ह्यासाठी आवश्यक असलेला पेट्रोल व डिझेलचा साठा पर्याप्त प्रमाणात राखण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तसेच कोणत्याही परिस्थितीत साठाबाजी किंवा चढ्या दराने विक्री होणार नाही, याबाबत कडक सूचना देण्यात आल्या.

पेट्रोल पंपधारकांच्या सूचनेनुसार रविवारी तेल डेपो सुरू ठेवणे, तसेच मागणीनुसार इंधन उपलब्ध करून देण्याबाबत तेल कंपन्यांना सूचना करण्यात आल्या. पेट्रोलपंपांवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याच्या सूचना अतिरिक्त पोलीस अधीक्षक सूरज गुरव यांना देण्यात आल्या.

जिल्ह्यातील उपलब्ध साठ्याचा आढावा घेतला असता, दैनंदिन गरजेनुसार पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.

# देशात ६० दिवसांचा इंधन साठा शिल्लक

## केंद्र सरकारकडून माहिती

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– भारतातील पेट्रोलियम आणि एलपीजी पुरवठ्याची परिस्थिती पूर्णपणे सुरक्षित आणि नियंत्रणात असल्याचे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. देशभरातील सर्व किरकोळ इंधन केंद्रांवर पुरेसा साठा उपलब्ध आहे. देशात कुठेही पेट्रोल, डिझेल किंवा एलपीजीची कमतरता नाही, असे देखील मंत्रालयाने सांगितले आहे. विनाकारण घबराट निर्माण करण्यासाठी हेतूपुरस्सर चालवल्या जाणाऱ्या तसेच अशा प्रकारची चुकीची माहिती पसरवण्याच्या मोहिमेला बळी पडू नये, असे आवाहन मंत्रालयाने नागरिकांना केले आहे.

भारत हा ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने जगात एक बळकट आणि सुरक्षित देश आहे. भारत हा जगातील चौथा सर्वात मोठा रिफायनर (शुद्धीकरण करणारा) आणि पेट्रोलियम उत्पादनांचा पाचवा सर्वात मोठा निर्यातदार देश असून तो १५० पेक्षा जास्त देशांना शुद्ध इंधनाचा पुरवठा करतो. भारत हा जगासाठी निव्वळ निर्यातदार देश असल्यामुळे देशांतर्गत पेट्रोल आणि डिझेलची उपलब्धता संरचनात्मकदृष्ट्या सुनिश्चित आहे. देशभरातील १ लाखांपेक्षा जास्त किरकोळ इंधन विक्री केंद्रे खुली असून इंधनाचा पुरवठा अखंडितपणे सुरू आहे.

कोणत्याही केंद्राला इंधन वितरणावर मर्यादा घालण्याचे निर्देश दिलेले नाहीत. जगभरात अनेक देश भाववाढ, रेशनिंग, सम-विषम वाहन निर्बंध आणि सक्तीने पेट्रोल पंप बंद करणे यांसारख्या समस्यांना तोंड देत आहेत. काहींनी तर राष्ट्रीय ऊर्जा आणीबाणी जाहीर केली आहे. मात्र, भारताला अशा कोणत्याही उपाययोजनांची गरज वाटत नाही. इतर देश इंधन वितरणावर मर्यादा घालत असताना भारतात पुरवठ्याची कोणतीही कमतरता नाही. काही निवडक पंपांवर घाबरून इंधन खरेदीच्या घडलेल्या तुरळक घटना समाज माध्यमावर पसरवण्यात आलेल्या दिशाभूल करणाऱ्या व्हिडिओमुळे घडल्या होत्या. अशा पंपांवर मागणीत प्रचंड वाढ होऊनही, सर्व ग्राहकांना इंधनाचा पुरवठा करण्यात आला आणि पुरवठा वाढवण्यासाठी तेल कंपन्यांचे डेपो रात्रभर कार्यरत होते.

तसेच पंप मालकांच्या खेळत्या भांडवलाच्या समस्यांमुळे कोणत्याही पंपावर पेट्रोल आणि डिझेलची कमतरता भासू नये, यासाठी पेट्रोल पंपांना तेल कंपन्यांनी क्रेडिट कालावधी पूर्वीच्या १ दिवसांवरुन वाढवून ३ दिवसांपेक्षा जास्त करण्यासाठी पावले उचलली आहेत.

# राज्यात वीजेची कुठलीही दरवाढ नाही, २०३० पर्यंत दरकपात होणार

**मुंबई (प्रतिनिधी)**– महावितरणच्या २०२५-२६ ते २०२९-३० या पाच आर्थिक वर्षांच्या बहुवार्षिक वीजदर याचिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आपला आदेश शुक्रवारी प्रसिद्ध केला आहे. महावितरणने पाच वर्षांत वीजदर कपातीसाठी मांडलेला प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. घरगुती, औद्योगिक, वाणिज्यिक अशा सर्व प्रवर्गातील ग्राहकांसाठीचे वीजदर २०३० पर्यंत टप्प्याटप्प्याने दरवर्षी कमी होणार आहेत.



कोणत्याही प्रवर्गात वीजदर वाढणार नाहीत. महावितरणच्या याचिकेवर आयोगाने गेल्या वर्षी मार्च अखेरीस एक आदेश दिला होता. त्या आदेशाला स्थगिती देण्यात आली होती.

महावितरणच्या पुनर्विचार याचिकेनुसार आयोगाने जून २०२५ मध्ये एक आदेश दिला होता. त्या आदेशाला काहीजणांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयाने नैसर्गिक न्यायाच्या तत्वावर बोट ठेऊन जूनचा आदेश रद्द केला होता. सर्वोच्च न्यायालयानेही नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे पालन करून व तांत्रिक बाबी पूर्ण करून आदेश देण्याची सूचना नोव्हेंबरमध्ये केली होती. त्यानुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरणच्या पुनर्विचार याचिकेवर जनसुनावणी करून, नैसर्गिक न्याय तत्त्वाचे पालन करून व सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करून आता आदेश दिला आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन झाले आहे. तसेच आता २०३० पर्यंतच्या वीजदराबाबत स्पष्टता आली आहे.

# चोरीच्या संशयावरून बापानेच दोन लेकींना रात्रभर उलटं टांगलं

**सांगली (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील बनपुरी (ता. आटपाडी) येथे एका निर्दयी बापाने पोटच्या दोन लहान मुलींचा अमानुष छळ केल्याची हृदयद्रावक घटना उघडकीस आली.

केवळ चोरीच्या संशयावरून बापाने दिलेल्या क्रूर शिक्षेमुळे १० वर्षीय सानिकाचा मृत्यू झाला असून, दुसरी मुलगी मृत्यूशी झुंज देत आहे. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. नाना हैबत यमगर या नराधम बापाने शेजारच्या घरात चोरी केल्याच्या केवळ संशयावरून आपल्या दोन मुलींना घरातील पत्र्याच्या अँगलला 'उलटे' टांगून ठेवले होते.

# अशोक खरातला मोठा दणका, पोस्को अतंर्गत गुन्हा दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)**– नाशिकचा भोंदुबाबा अशोक खरात याच्या अडचणी आता वाढतच आहेत. महिला अत्याचार प्रकरणात त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल झाले आहेत. दरम्यान आता अशोक खरात याच्यावर पोस्कोअंतर्गत देखील गुन्हा दाखल झाला आहे.

अशोक खरात सध्या पोलीस कोठडीमध्ये असून, त्याला न्यायालयानं २९ मार्च पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. त्याची एसआयटीकडून देखील चौकशी सुरू आहे. दरम्यान अशोक खरात याच्यावर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यानंतर पुन्हा एकदा रुपाली पाटील ठोंबरे यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट करत रुपाली चाकणकर यांच्यावर हल्लाबोल केला आहे.

रूपाली ठोंबरे यांनी केलेल्या पोस्टमध्ये 'भोंदूबाबा १०वी नापास खरातने, शालेय विद्यार्थ्यांना सुद्धा सोडले नाही, त्यांच्यावर त्याचे आई-वडील बाहेर थांबून नराधमाने अत्याचार केला. तर चाकणवर यांनीही महाराष्ट्राचे माता भगिनी लेकरांचे कुटुंबाचे वाटोळे केले आहे, असे म्हटले आहे.

# एस-४०० मिसाइलसह संरक्षण उपकरणांच्या खरेदीस मंजुरी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– भारतीय संरक्षण मंत्रालयाने हवाई दलासाठी रशियाकडून एस-४०० एअर डिफेन्स सिस्टमची अतिरिक्त बॅटरी खरेदी करण्यास मंजुरी दिली आहे. रक्षा मंत्रालयाच्या डिफेन्स एक्विझिशन कौन्सिलने (डीएसी) या प्रस्तावाला मान्यता दिली.

भारताने २०१८ मध्ये रशियाशी एस-४०० एअर डिफेन्स मिसाईल सिस्टम खरेदी करण्यासाठी ४०,००० कोटी रुपयांची करार केलेली होती. या करारानुसार भारताला ५ स्कॉड्रन्स मिळणार आहेत, ज्याची डिलिव्हरी २०२१ पासून सुरू झाली होती.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी झालेल्या डीएसीच्या बैठकीत सुमारे २.३८ लाख कोटी रुपयांच्या विविध हत्यारं आणि विमान खरेदीच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. बैठकीत रक्षा मंत्री राजनाथ सिंग यांनी भारतीय हवाई दलासाठी रशियाकडून लांब पल्ल्यावरील सतह-हवेत मार करणारी एस-४०० मिसाईल सिस्टम, मिडियम ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्ट, रिमोटली पायलटेड स्ट्राईक एअरक्राफ्ट आणि एसयू-३० एयरो इंजिन ओव्हरहॉलच्या प्रस्तावांना देखील मंजुरी दिली.

# भारतीय तरुणांना परदेशात विकणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीचा पर्दाफाश

**मुंबई (प्रतिनिधी)**– भारतीय नागरिकांना परदेशात नोकरीचे आमिष दाखवून त्यांची मानवी तस्करी करणाऱ्या एका मोठ्या आंतरराष्ट्रीय टोळीचा सीबीआयने छडा लावला आहे. या रॅकेटचा मुख्य सूत्रधार सुनील नेल्लाथू रामकृष्णन उर्फ 'कृष' याला मुंबईतून अटक करण्यात आली आहे. सुनील हा म्यानमारमधील कुख्यात सायबर फसवणूक केंद्रांमध्ये भारतीयांना गुलाम म्हणून विकण्याचे काम करत असल्याचा खळबळजनक आरोप त्याच्यावर आहे.

# शेअर बाजारात हाहाकार! ९ लाख कोटी पाण्यात!


## रिलायन्ससह दिग्गज कंपन्यांचे शेअर्स कोसळले



**मुंबई (प्रतिनिधी)**– जागतिक पातळीवरील तणाव आणि वाढत्या आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण पाहायला मिळाली आहे. शुक्रवारच्या व्यवहारात सेन्सेक्स तब्बल १७०० अंकांनी घसरला, तर निफ्टीही २२,८५० च्या खाली घसरला. या घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे सुमारे ९ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचं समोर आलं आहे.

बाजारातील या घसरणीमुळे गुंतवणूकदारांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं असून अनेक मोठ्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी पडझड झाली आहे. विशेषतः रिलायन्स इंडस्ट्रीज, एचडीएफसी बँक, इंडिगो यांसारख्या दिग्गज कंपन्यांच्या शेअर्सवर दबाव दिसून आला.

शेअर बाजारातील या मोठ्या घसरणीमागे अनेक जागतिक आणि स्थानिक कारणांचा परिणाम दिसून आला. अमेरिका-इराण संघर्षामुळे जागतिक बाजारात अनिश्चितता वाढली आहे. यासोबतच कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती, रुपयाची घसरण आणि परदेशी गुंतवणूकदारांची विक्री यामुळे बाजारावर दबाव आला आहे. या घसरणीत गुंतवणूकदारांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. काही तासांतच लाखो कोटी रुपयांची संपत्ती पाण्यात गेली. सलग काही दिवसांच्या तेजीनंतर अचानक आलेल्या या घसरणीमुळे छोट्या गुंतवणूकदारांना मोठा फटका बसला आहे.




# इकरा इंटरनॅशनल शाळेच्या केंद्रावरील प्रकार: बीएड-सीईटी परीक्षा सुरू असताना गोंधळ; संगणकामध्ये बिघाड, विद्यार्थ्यांनी केला रास्ता रोको

**नांदेड (प्रतिनिधी)**– भावी शिक्षकांसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी बीएड-सीएटी परीक्षा केंद्रावर संगणकामध्ये बिघाड आल्याने अनेक विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित राहावे लागले. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांचे ऐकून घेण्यासाठी परीक्षा केंद्रावरील एकही अधिकारी किंवा कर्मचारी पुढे येत नसल्याने संतप्त झालेल्या परीक्षार्थींनी शाळेसमोर असलेल्या मुख्य राज्यमार्गावर येऊन रास्ता रोको केला. विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळावे, यासाठी पुन्हा परीक्षा घ्याव्यात अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.



शहरातील बोंढार परिसरातील गुलजार एज्युकेशन सोसायटीअंतर्गत इकरा इंटरनॅशनल शाळेत मराठवाडा ऑनलाईन परीक्षा केंद्र होते. गैरव्यवस्थेमुळे हजारो विद्यार्थ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागला असून अनेक विद्यार्थ्यांना परीक्षा देता न आल्याने शैक्षणिक नुकसान झाले आहे.

बीएड अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळविण्यासाठी घेण्यात येणारी ही ऑनलाईन प्रवेश परीक्षा सकाळपासूनच अडचणीत सापडली. परीक्षा सुरू होण्यापूर्वीच केंद्रावर विद्यार्थ्यांची मोठी गर्दी झाली होती. मात्र केंद्रावर पुरेशी बैठक व्यवस्था नसल्याचे स्पष्ट झाले. अनेक विद्यार्थ्यांना बसण्यासाठी जागा उपलब्ध नव्हती, तर काहींना तासंतास उभे राहून प्रतीक्षा करावी लागली. अनेक विद्यार्थ्यांनी रास्ता रोको करून आपल्या भावना व्यक्त केल्या.

विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, परीक्षा केंद्रावर संगणकांची संख्या अपुरी होती. नियोजित विद्यार्थ्यांच्या तुलनेत कमी संगणक उपलब्ध असल्यामुळे अनेकांना लॉगिनच करता आले नाही. काही विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरू केली असताना इंटरनेट सेवा अचानक बंद पडली. परिणामी अर्धा पेपर सोडविल्यानंतर परीक्षा प्रणाली बंद झाली आणि विद्यार्थ्यांचे उत्तरपत्र सादर होऊ शकले नाही.

गुलजार एज्युकेशन सोसायटी अंतर्गत असलेल्या इक्बाल इंटरनॅशनल स्कूल (Iqra International School) तेथे आयोजित करण्यात आलेल्या या ऑनलाईन परीक्षेत सुविधा अत्यंत अपुऱ्या असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी आहे. वर्षानुवर्षे मेहनत घेऊन बीएड प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे परीक्षेला मुकावे लागल्याने संताप व्यक्त करण्यात आला.

या प्रकाराची दखल घेऊन संबंधित परीक्षा प्राधिकरणाने तातडीने चौकशी करावी, दोषींवर कारवाई करावी आणि बाधित विद्यार्थ्यांसाठी पुनर्परीक्षा जाहीर करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या अशा प्रकारांवर कठोर निर्णय घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

नांदेडमधील या घटनेमुळे राज्यातील ऑनलाइन परीक्षा व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून आगामी परीक्षांसाठी प्रशासनाने योग्य नियोजन करणे अत्यावश्यक असल्याचे शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी नमूद केले आहे.

# महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधीची स्थापना

**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्यातील दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घेत महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधी स्थापन करण्यास मंजुरी दिली असून, या निधीसाठी प्रारंभी २० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निधीमुळे दिव्यांगांच्या हक्काधारित, सर्वसमावेशक आणि परिणामकारक सक्षमीकरणाला आर्थिक पाठबळ मिळणार असल्याचे दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

सचिव तुकाराम मुंढे म्हणाले, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम ८८ नुसार स्थापन होणारा हा निधी दिव्यांगांच्या हक्काधारित सक्षमीकरणासाठी आर्थिक पाठबळ देणार आहे. राज्य शासनाने दिव्यांग कल्याण विभागाची पुनर्रचना करून त्याला 'दिव्यांग सक्षमीकरण विभाग' असे स्वरूप दिले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# घाईघाईत केलेले कायदे कितपत फायद्याचे?

संसदेत अलीकडेच मंजूर करण्यात आलेल्या ट्रान्सजेंडर अर्थात लिंग परिवर्तन सुधारणा विधेयकाच्या मंजूर होण्याने आपल्या विधिमंडळाच्या कार्यपद्धतीबाबत गंभीर प्रश्न पुन्हा एकदा समोर आले आहेत. समाजातील वंचित आणि संवेदनशील घटकांशी संबंधित कायदे करताना आवश्यक असलेली सखोल चर्चा, सल्लामसलत आणि संवेदनशीलता बाजूला ठेवून, केवळ गती आणि राजकीय प्रतिमेला प्राधान्य दिले जात असल्याचे चित्र यातून स्पष्ट होते. लोकशाही व्यवस्थेत कोणतेही विधेयक हे केवळ कागदी तरतुदींचे संकलन नसते, तर ते समाजाशी केलेला एक प्रकारचा करार असतो. त्यामुळे अशा कायद्यांची निर्मिती करताना विविध घटकांचा सहभाग आणि मतांची देवाणघेवाण अत्यावश्यक असते. मात्र या विधेयकाच्या बाबतीत सरकारने घाईगडबडीने निर्णय घेतल्याचे दिसून येते. विरोधकांनी या विधेयकाला निवड समितीकडे पाठवण्याची केलेली मागणी ही कोणतीही अडथळा निर्माण करण्याची भूमिका नव्हती, तर ती एक लोकशाही प्रक्रियेचा भाग होती. निवड समितीसारख्या यंत्रणा यासाठीच अस्तित्वात आहेत की, त्या विधेयकातील त्रुटी दूर करून त्याला अधिक परिपूर्ण बनवू शकतील. तज्ज्ञांचे मत, विविध हितधारकांचे अनुभव आणि सामाजिक वास्तव यांचा विचार करून कायद्याला अधिक प्रभावी बनवणे ही त्यांची जबाबदारी असते. या प्रकरणातील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे ट्रान्सजेंडर हक्कांसाठी काम करणाऱ्या संघटनांची प्रतिक्रिया. त्यांचे म्हणणे आहे की, या विधेयकाच्या तयार प्रक्रियेत त्यांचा कोणताही सहभाग नव्हता. हे केवळ प्रक्रियात्मक दुर्लक्ष नसून, कायद्याच्या वैधतेवरच प्रश्नचिन्ह उभे करणारे आहे. ज्या लोकांच्या जीवनावर, ओळखीवर आणि अधिकारांवर या कायद्याचा थेट परिणाम होणार आहे, त्यांनाच जर विचारले गेले नाही तर अशा कायद्याला कितपत न्याय्य म्हणता येईल? याहूनही गंभीर बाब म्हणजे या विधेयकाने लिंग ओळखीच्या विविध आणि प्रवाही स्वरूपाला केवळ काही मर्यादित चौकटीत बसवण्याचा प्रयत्न केला आहे. लिंग ओळख ही केवळ काही ठराविक गटांमध्ये विभागता येणारी गोष्ट नाही. ती व्यक्तिनिष्ठ, सामाजिक आणि सांस्कृतिक अनुभवांशी जोडलेली एक व्यापक संकल्पना आहे. मात्र या विधेयकात तिचे अतिसुलभीकरण करण्यात आले आहे, जे भविष्यात वंचिततेला संस्थात्मक स्वरूप देण्याचा धोका निर्माण करू शकते. ही बाब केवळ या एका विधेयकापुरती मर्यादित नाही. अलीकडच्या काळात अशा अनेक घटनांमध्ये सरकारने सल्लामसलत आणि चर्चा यांना दुय्यम स्थान दिल्याचे दिसते. अशा महत्त्वाच्या विधेयकांमध्येही पुरेशी चर्चा न करता निर्णय घेतल्याने शैक्षणिक स्वायत्तता आणि संघराज्यीय संतुलनाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली होती. या सर्व घटनांमध्ये एक समान धागा दिसतो तो म्हणजे लोकशाही प्रक्रियेतील संवादाला कमी लेखण्याची प्रवृत्ती. कायद्यांची ताकद ही केवळ त्यांच्या अंमलबजावणीत नसते, तर ती त्यांच्या स्वीकारार्हतेत असते. जेव्हा एखादा समुदाय स्वतःला दुर्लक्षित समजतो, तेव्हा त्या कायद्याची नैतिक ताकद कमी होते. संसदेत सखोल चर्चा न होणे हे त्या संस्थेच्या विश्वासार्हतेलाही धक्का देणारे आहे. विशेषतः ओळख, अधिकार आणि सन्मान यांसारख्या संवेदनशील विषयांवर कायदे करताना घाई करणे हे अनेकदा संबंधित घटकांच्या अस्तित्वालाच नाकारण्यासारखे ठरते. सरकारकडून 'तातडीची आवश्यकता' या कारणाखाली अशा घाईगडबडीच्या निर्णयांचे समर्थन केले जाते. मात्र, तत्काळता ही समज आणि संवेदनशीलतेची जागा घेऊ शकत नाही. उलट, अशा घाईमुळे अनेक महत्त्वाचे मुद्दे दुर्लक्षित राहतात आणि त्याचे दुष्परिणाम दीर्घकाळ जाणवतात. भारतीय लोकशाहीची खरी ताकद ही कायदे किती वेगाने केले जातात यावर नाही, तर ते किती विचारपूर्वक आणि सर्वसमावेशक पद्धतीने केले जातात यावर अवलंबून आहे. ट्रान्सजेंडर सुधारणा विधेयकाच्या बाबतीत ही कसोटी पूर्ण होताना दिसत नाही. संवाद, सल्लामसलत आणि संवेदनशीलता यांचा अभाव असल्याने हे विधेयक अपेक्षित उद्दिष्ट साध्य करू शकेल का, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. आज गरज आहे ती लोकांच्या सहभागातून, त्यांच्या अनुभवांचा आदर ठेवून आणि सामाजिक वास्तव लक्षात घेऊन करण्याची. अन्यथा कायदे कागदावर राहतील, पण ज्यांच्यासाठी ते बनवले गेले आहेत त्यांच्यापर्यंत त्याचा खरा फायदा पोहोचणार नाही.

# मानवतेची दूत व कर्तव्यनिष्ठेची आदर्श : नीरजा भनोत

भारताच्या इतिहासात काही व्यक्ती अशा आहेत, ज्यांनी आपल्या कर्तव्यनिष्ठा, धैर्य आणि मानवतेच्या बळावर अमरत्व प्राप्त केले. आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धेच्या युगातही काही व्यक्तिमत्त्वे आपल्या असामान्य धैर्याने आणि कर्तव्यनिष्ठेने समाजाला दिशा देतात. अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे नीरजा भानोत. एकीकडे मॉडेलिंग क्षेत्रात आपली ओळख निर्माण करणारी ही तरुणी, तर दुसरीकडे आंतरराष्ट्रीय विमान कंपनी झरपामध्ये क्रू मेंबर म्हणून जबाबदारी सांभाळणारी कर्तव्यदक्ष कर्मचारी असा तिचा बहुआयामी प्रवास होता. तिच्या आयुष्याला खऱ्या अर्थाने ऐतिहासिक वळण मिळाले ते झरपा Flight 73 या विमानाच्या अपहरणाच्या भीषण प्रसंगात. या संकटसमयी तिने दाखवलेले धैर्य, प्रसंगावधान आणि मानवतेची जाणीव यामुळे ती केवळ एक विमान कर्मचारी न राहता, तर शेकडो प्रवाशांचे प्राण वाचवणारी नायिका ठरली.

मॉडेलिंगच्या चमकदार दुनियेतून सुरू झालेला तिचा प्रवास, विमानसेवेतील जबाबदारी आणि शेवटी अपहरणाच्या संकटात बजावलेली तिची भूमिका अन् तिची कहाणी आजही प्रत्येकाला प्रेरणा देणारी ठरते. केवळ २३ वर्षांच्या अल्पवयात त्यांनी दाखवलेले अद्वितीय शौर्य आजही संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी आहे. ७ सप्टेंबर १९६३ रोजी चंदीगड येथे त्यांचा जन्म झाला. वडील हरीश भानोत हे पत्रकार होते आणि आई रमा भानोत यांच्या सुसंस्कृत कुटुंबात त्यांचे बालपण गेले. शिक्षणात त्या हुशार होत्या, तसेच त्यांना कला आणि सर्जनशीलतेची आवड होती. पुढे त्यांचे कुटुंब मुंबई येथे स्थलांतरित झाले, जिथे त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. मुंबईत असतानाच त्यांना मॉडेलिंगच्या क्षेत्रात संधी मिळाली आणि त्यांनी अमूल, बिनाका, गॉदरेज यांसारख्या अनेक नामांकित जाहिरातींमध्ये काम करून आपली ओळख निर्माण केली.

जीवनाच्या एका टप्प्यावर त्यांना वैयक्तिक आयुष्यातील आव्हानांना सामोरे जावे लागले. १९८५ साली त्यांचा विवाह झाला, पण तो फार काळ टिकला नाही. मात्र या कठीण प्रसंगातून बाहेर पडत त्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा निर्धार केला. त्याच काळात त्यांनी विमान परिचारिका म्हणून करिअरची दिशा निवडली आणि झरपा या आंतरराष्ट्रीय विमान कंपनीत प्रवेश मिळवला. प्रशिक्षणासाठी त्या अमेरिकेतील मियामी येथे गेल्या आणि परत येताना 'पर्सर' या जबाबदारीच्या पदावर कार्यभार स्वीकारला.



नीरजाच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा आणि निर्णायक क्षण ५ सप्टेंबर १९८६ रोजी आला. त्या दिवशी त्या झरपा Flight 73 या विमानावर वरिष्ठ फ्लाइट पर्सर म्हणून कार्यरत होत्या. हे विमान मुंबईहून कराचीमार्गे न्यूयॉर्ककडे जात होते. कराची विमानतळावर चार दहशतवाद्यांनी विमानाचे अपहरण केले आणि सुमारे १७ तास चाललेले भीषण संकट सुरू झाले. या अत्यंत धोकादायक परिस्थितीत नीरजाने अतुलनीय धैर्य आणि बुद्धिमत्ता दाखवली. अपहर्त्यांनी विमानात प्रवेश करताच त्यांनी तत्काळ कॉकपिट कर्मचाऱ्यांना इशारा दिला, ज्यामुळे पायलट आणि इतर अधिकारी सुरक्षितरित्या विमानातून बाहेर पडू शकले. या एका निर्णयामुळे विमान उड्डाण होण्यापासून थांबले आणि शेकडो जीव वाचण्याची शक्यता निर्माण झाली. यानंतरही नीरजाचे धैर्य कमी झाले नाही. दहशतवाद्यांनी प्रवाशांचे पासपोर्ट गोळा करण्याचा आदेश दिल्यावर त्यांनी अत्यंत चातुर्याने अनेक अमेरिकन प्रवाशांचे पासपोर्ट लपवून ठेवले. यामुळे अपहर्त्यांना विशिष्ट प्रवाशांना लक्ष्य करणे कठीण झाले. संकटाच्या त्या काळात त्यांनी केवळ कर्तव्य निभावले नाही, तर मानवतेचा उच्चतम आदर्शही ठेवला. १७ तासांच्या तणावानंतर जेव्हा दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केला, तेव्हा नीरजाने स्वतःचा जीव धोक्यात घालून प्रवाशांना सुरक्षित बाहेर पडण्यास मदत केली. त्या स्वतः आधी पळून जाऊ शकल्या असत्या, पण त्यांनी तसे न करता इतरांचे प्राण वाचवणे निवडले. विशेषतः तीन लहान मुलांना वाचवण्याच्या प्रयत्नात त्यांना गोळी लागली आणि त्या वीरमरण पावल्या.

नीरजा भानोत यांच्या या अद्वितीय बलिदानामुळे शेकडो प्रवाशांचे प्राण वाचले. त्यांच्या या शौर्याची दखल घेऊन त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर १९८७ साली शांततेच्या काळातील सर्वोच्च शौर्य पुरस्कार म्हणून अशोक चक्र प्रदान केले. तमघा-ए-इन्सानियत १९८७ साली पाकिस्तान सरकारकडून मानवी दयाभावासाठी प्रदान. Flight Safety Foundation Heroism ward १९८७ साली अमेरिकेकडून विमान क्षेत्रातील शौर्यासाठी प्रदान. त्यांच्या स्मरणार्थ २००४ मध्ये भारतीय टपाल विभागाने टपाल तिकीट प्रकाशित केले.




Justice for Crimes ward २००५ साली अमेरिकेतर्फे गुन्हेपीडितांसाठी न्यायासाठी योगदानाबद्दल प्रदान. Special Courage ward २००६ साली अमेरिकेकडून विशेष धैर्यासाठी प्रदान.

नागरी विमान मंत्रालय पुरस्कार २०११ साली भारत सरकारकडून विमान क्षेत्रातील योगदानाबद्दल प्रदान. भारत गौरव पुरस्कार २०१६ साली युनायटेड किंगडमच्या संसदेतील सन्मान म्हणून प्रदान. त्यांच्या कुटुंबाने 'नीरजा भानोत ट्रस्ट'ची स्थापना करून दरवर्षी धैर्यवान महिलांना आणि कर्तव्यनिष्ठ कर्मचाऱ्यांना पुरस्कार देण्याची परंपरा सुरू ठेवली आहे. हे कार्य त्यांच्या विचारांचा आणि मानवतेच्या संदेशाचा प्रसार करत आहे. त्यांच्या जीवन प्रवासावर अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. ती म्हणजे The Neerja I Knew अनीश भानोत यांनी संकल्पित केलेले हे कॉफी टेबल पुस्तक असून, त्यामध्ये नीरजाच्या आठवणी, अनुभव आणि तिच्या जवळच्या व्यक्तींचे लेख समाविष्ट आहेत.

The Smile of Courage त्यांचे भाऊ अनीश भानोत यांनी लिहिलेले हे प्रेरणादायी चरित्र असून, त्यामध्ये नीरजाच्या जीवनाचा आणि तिच्या शौर्याचा सविस्तर आढावा दिला आहे. Neerja Bhanot (Yug People) सोनम मंत्री यांनी लिहिलेले हे मुलांसाठीचे पुस्तक असून, त्यामध्ये नीरजाची कथा सोप्या आणि समजण्यासारख्या भाषेत मांडलेली आहे. Neerja : Life of Courage तरुण अक्षय यांनी लिहिलेले हे लघु चरित्र असून, त्यामध्ये नीरजाच्या धैर्यपूर्ण जीवनाचा संक्षिप्त परिचय दिला आहे.

नीरजाच्या जीवनावर आधारित Neerja हा चित्रपट २०१६ साली प्रदर्शित झाला. या चित्रपटामुळे त्यांच्या शौर्याची कहाणी नव्या पिढीपर्यंत पोहोचली आणि अनेकांना प्रेरणा मिळाली. नीरजा भानोत यांचे जीवन आपल्याला शिकवते की, खरे धैर्य हे केवळ संकटात टिकून राहण्यात नसून इतरांसाठी स्वतःचा त्याग करण्यात आहे. त्यांनी आपल्या कर्तव्याला सर्वोच्च स्थान दिले आणि मानवतेचा संदेश जगाला दिला. आजच्या काळात, जेव्हा स्वार्थ आणि भीती यांचा प्रभाव वाढताना दिसतो, तेव्हा नीरजासारख्या व्यक्तिमत्त्वांची आठवण आपल्याला नवी ऊर्जा आणि प्रेरणा देते. त्यांच्या बलिदानामुळे त्या केवळ भारताच्याच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीच्या हृदयात कायमस्वरूपी स्थान मिळवून गेल्या आहेत. नीरजा भानोत या खऱ्या अर्थाने अपहरणाची नायिका ठरल्या. संकटाच्या काळातही मानवतेचा दीप प्रज्वलित ठेवता येतो हे दाखवून देणारी ही यशोगाथा.

**-डॉ. दीपाली पांडे देशमुख**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणी सावरगाव

# इंक्रेडिबल प्रीमियम लीग

जगातील सर्वाधिक महागडी आणि लोकप्रिय लीग म्हणून ओळखली जाणारी इंडीयन प्रीमियम लीग अर्थात आयपीएलच्या एकोणिसाव्या हंगामाची सुरुवात आजपासून म्हणजे २८ मार्च पासून होणार असून पुढील दोन महिने आयपीएलचा थरार चालू राहणार असल्याने क्रिकेट प्रेमींसाठी ती मोठी मेजवानी ठरणार आहे. आयपीएलची सुरुवात २००८ साली झाली. म्हणजे आज आयपीएलला अठरा वर्ष पूर्ण झाली. या अठरा वर्षात क्रिकेटच्या मैदानात आणि मैदानाच्या बाहेर अनेक घडामोडी घडल्या पण आयपीएलची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही. आयपीएललाही मॅच फिक्सिंग सारखी किड लागली होती. मॅच फिक्सिंगचा आरोप झाल्याने काही खेळाडूंना कायमचे घरी बसवण्यात आले तर चेन्नई आणि राजस्थान या सारख्या लोकप्रिय संघावर दोन वर्षाची बंदी घालण्यात आली होती. मॅच फिक्सिंग मुळे आयपीएलला उतरती कळा लागेल असा अंदाज बांधला जात होता मात्र तो फोल ठरला उलट आयपीएल आणखी लोकप्रिय ठरली. कोरोनाचा फटका जसा इतर क्रीडा प्रकारांना बसला तसाच तो आयपीएललाही बसला. कोरोनाच्या सावटातही बीसीसीआयने आयपीएलचे यशस्वी आयोजन केले. कधी देशात तर कधी परदेशात, कधी प्रेक्षकांशिवाय तर प्रेक्षकांसह आयपीएलचे आयोजन करून बीसीसीआयने क्रिकेट प्रेमींना आयपीएलचा थरार अनुभवण्याची संधी दिली.

जगभरातील इतर लीग कोरोनामुळे ठप्प झाल्या असताना बीसीसीआयने आयपीएलचे यशस्वी आयोजन करून जगापुढे व्यवस्थापनाचा आदर्श घालून दिला. सुरवातीला आठ संघात खेळली जाणारी ही स्पर्धा दोन वर्षापासून दहा संघात खेळली जात आहे. गुजरात टायटन आणि लखनौ सुपर जायंटस या दोन नव्या संघाची आयपीएलमध्ये एंट्री झाल्याने आयपीएलचा थरार



आणखी वाढला आहे. विशेष म्हणजे यातील गुजरात टायटन या संघाने पदार्पणातच विजेतेपद मिळवत अनेकांना अचंबित केले इतकेच नव्हे सलग दोन वर्ष हा संघ अंतिम फेरीत पोहचला म्हणजे पदार्पणाच्या पहिल्या दोन वर्षातचच विजेतेपद आणि उपविजेतेपद मिळवत या संघाने आपले कर्तुत्व दाखवून दिले आहे.

आयपीएलमध्ये दहा संघ असेल तरी आयपीएलवर चेन्नई आणि मुंबई या दोन संघाचेच वर्चस्व राहिले आहे. दोन्ही संघाने प्रत्येकी पाच विजेतेपद पटकावित आयपीएलवर आपले एकहाती वर्चस्व सिद्ध केले आहे. या दोघांशिवाय कोलकोता आणि हैद्राबाद या संघाने प्रत्येकी दोनदा विजेतेपद मिळवले आहे तर राजस्थान आणि गुजरात या संघाने एकदा विजेतेपदावर नाव कोरले आहे. मागील वर्षी म्हणजे २०२५ साली रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या संघाने विजेतेपद मिळवून आपल्या विजेतेपदाचा दुष्काळ मिटविला. पंजाब, दिल्ली, लखनऊ या सारख्या प्रबळ संघांना मात्र अद्याप एकदाही विजेतेपदाला गवसणी घालता आलेली नाही यावर्षी आयपीएलला नवा विजेता मिळेल का ? याची उत्सुकता क्रिकेटप्रेमींना लागूली आहे. अर्थात यावर्षीही चेन्नई आणि मुंबई हेच दोन संघ विजेतेपदासाठी प्रबळ दावेदार आहेत. याशिवाय कोलकाता, बंगळुरू आणि गुजरात हे देखील विजेतेपदाच्या शर्यतीत आहेत. कदाचित यावेळी एखाद्या नव्याच संघाने विजेतेपद पटकावून सर्वांना अचंबित केल्यास आश्चर्य वाटायला नको. या वेळेची स्पर्धा एका नव्या कारणाने देखील चर्चेत आहे ती म्हणजे या वेळी अनेक संघांनी आपले कर्णधार बदलले आहे. ज्या धोनी आणि रोहित शर्माने आपल्या संघाला पाच विजेतेपद मिळवून दिले त्यांना यावेळी फक्त खेळाडू म्हणून मैदानात उतरावे लागेल कारण मुंबईच्या संघ व्यवस्थापनाने रोहित शर्माच्या जागेवर हार्दिक पांड्याची कर्णधार म्हणून निवड केली आहे तर धोनीने स्वतः कर्णधार पदाचा त्याग केल्याने युवा ऋतुराज गायकवाडच्या गळ्यात चेन्नईच्या कर्णधारपदाची माळ पडली आहे.

गुजरात संघाच्या कर्णधार पदाची धुरा युवा शुभमन गीलच्या खांद्यावर आहे. कोलकोताचा कर्णधार अनुभवी अजिंक्य रहाणे हा आहे तर मागील वर्षी कोलकताचा कर्णधार असलेला श्रेयस अय्यर यावेळी पंजाब सुपर किंग्सचा कर्णधार आहे तर जीवघेण्या अपघातातून बाचवलेला ऋषभ पंत लखनऊचा कर्णधार असून दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेल आहे. युवा रजत पाटीदारकडे बंगळुरूने नेतृत्व सोपवले तर ईशान किशनकडे हैदराबादची तर रियान परागकडे राजस्थानचे नेतृत्व सोपवून संघ मालकांनी त्यांच्यातील नेतृत्व गुणाला चालना दिली आहे. याच युवा खेळाडूंपैकी एखादा खेळाडू भविष्यात भारतीय संघाचे नेतृत्व करू शकतो म्हणजे भविष्यातील भारतीय संघाच्या कर्णधाराची पायाभरणी याच आयपीएल मधून होणार आहे. केवळ कर्णधारच नव्हे भविष्यातील संपूर्ण भारतीय संघच आयपीएल मधून निवडला जाईल. आज जे खेळाडू भारतीय संघात दिसतात ते सर्व खेळाडू आयपीएल मधूनच पुढे आले आहेत. भारतीय संघातील सूर्यकुमार यादव, जडेजा, शुभमन गिल, यशस्वी जयस्वाल, श्रेयस अय्यर, जसप्रीत बुमाराह, कुलदीप यादव, यजुवेंद्र चहल, वॉशिंगटन सुंदर, मोहंमद सिराज, संजू सॅमसन, ईशान किशन, वरुण चक्रवर्ती, अभिषेक शर्मा, ऋषभ पंत असे सर्वच खेळाडू आयपीएलची देण आहे. आयपीएलमध्ये चांगली कामगिरी केल्यानेच या खेळाडूंना भारतीय संघात प्रवेश मिळाला.

आयपीएल म्हणजे भारतीय संघात प्रवेश करण्याचे प्रवेश द्वार आहे त्यामुळेच आयपीएल मध्ये चांगली कामगिरी करण्यासाठी खेळाडू मैदानावर घाम गाळतात. आयपीएल मध्ये चांगली कामगिरी करून भारतीय संघात प्रवेश मिळवण्याचे स्वप्न सारे खेळाडू पाहतात ते स्वप्न यशस्वी करण्यासाठी ते जीवाचे रान करतात त्यामुळेच आयपीयलचे सर्व सामने रंगतदार होतात आणि प्रेक्षकांना खेळाचा मनमुराद आनंद लुटता येतो. यावर्षीही आयपीएलचे सर्व सामने रंगतदार होतील आणि प्रेक्षकांना खेळाचा मनमुराद आनंद लुटता येईल यात शंका नाही.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# झाडे लावा आणि सुंदर जगा

माणसाला माणसाचं अस्तित्व या पृथ्वीवर टिकवून ठेवायचं असेल तर काही बाबींचं नियोजन करावंच लागेल जसे की सुंदर व सुदृढ जगण्यासाठी गरज असते ती चांगल्या व्यायामाची, अंग मेहनतीची, वर्तणुकीची, प्रेमळ भावनेची, निस्वार्थपणाची, नाते जपण्याची, एकमेकांतल्या उत्तम संवादाची, काही देणे लागते या उदात्त भावनेची. अन् चांगल्या प्रकारे जगण्यासाठी गरज असते ती म्हणजे शुद्ध हवेची.

पृथ्वीतलावरचा एकमेव हुशार असलेला प्राणी म्हणजे मानव आहे. पण मानवाच्याच हातून बरेचसे नुकसान होताना दिसत आहे. त्यातलेच एक म्हणजे कमी होत असलेले झाडांचे प्रमाण आहे.

खरंतर दिवसेंदिवस जिकडे तिकडे झाडेच झाडे दिसायला पाहिजे होते पण तसं दिसत नाही. उलट झाडांचे प्रमाण वाढण्यापेक्षा कमी होताना दिसत आहे. आणि यातूनच सध्या मानव आपलं कर्तव्य विसरून जात असल्याची भीती निर्माण होत आहे. म्हणून या हुशार माणसाने निसर्गाशी तितक्याच हुशारिणे माणसासारखं वागलं पाहिजे तर आणि तरच निरोगी व सुंदर जीवन जगता येईल.



जन्माला येणाऱ्या प्रत्येक माणसाने आपापल्या परीने चांगले कर्म करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यातूनच काहीतरी देणे लागते या उद्देशाने काही न काही समाज हिताचे कामे केली पाहिजे. तसं तर मानवा सोबत निसर्गाची सेवा करायची असल्यास अनेक सेवा देण्याचे कार्य आहेत. कोणतेही एक चांगले काम हाती घेऊन पुढे जात राहिलं पाहिजे.

मानवाला धरतीवरती सुखाने जगायचं असल्यास काही गोष्टींचं नियोजन केलंच पाहिजे. त्यात सर्वप्रथम झाडे लावली पाहिजे. नीट संगोपन करुन त्याला जगवले पाहिजे. कारण बऱ्याचदा असं होतं की, नुसते नावालाच झाडे लावले जातात, वास्तव वेगळेच असते. म्हणून थोडी जरा अधिकची काळजी घेतली तर या सिमेंटच्या जंगलामध्ये थोडी थोडी झाडांची सावली वाढली की माणसांच्या जीवासोबत अनेक जीवजंतू पशु-पक्षी वन्यप्राण्यांचे ही जीवन भरपूर सुंदर होते याची प्रचिती मिळते. मानवाला हवेची जितकी गरज आहे? त्याच्या कितीतरी पटीने गरज आहे ती म्हणजे झाडांची. कारण एक झाड अनेक गुणांनी समृद्ध असते. सर्वांच्या आरोग्यासाठी प्राणवायू देणारे व जीवन सुदृढ ठेवण्यासाठी वनस्पतींचा खजाना घेऊन उभे टाकलेले असते. त्यासोबतच झाडांच्या सावलीने जमिनीला थंडावा मिळतो. फळे मिळतात...

धरती आणि निसर्गाचं कालचक्र अबाधित ठेवण्यासाठी झाडं सतत प्रयत्नशील असतात. एक वेळ माणूस बदलेल पण झाड बदलत नाही. तसेच झाडांच्या निमित्ताने पाण्याची पातळी ही टिकून राहण्यास मदत होते असे म्हणतात.

लिहिण्याचे कारण असं की, उन्हाळा चालू आहे. उन्हाचा कडाका खूप वाढलाय. तापमान वाढीचे काम अधिक तीव्र होत आहे. उन्हाळ्यात पाण्याची बचत करण्यासाठी बऱ्याच जणांकडून प्रयत्न होत नाहीत. बऱ्याच ठिकाणी पाण्याची टंचाई दिसायला लागली. टंचाईग्रस्त भागात ज्यांना पाणी नाही असे लोक डोक्यावर घागरी घेऊन पायपीट करतात आणि ज्यांना ज्यांना मुबलक पाणी आहे असे लोक विनाकारण पाणी वाया घालतात. म्हणून या ठिकाणी लिहिण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. खरं तर मी तज्ञ नाही. मला अधिकची जाणीव नाही. तरीही थोडक्यात मनाला जे वाटते ते लिहिण्याचा प्रयत्न करावा वाटते. किमान प्रतिवर्षी प्रत्येकाने एक तरी झाड लावून त्याला वाढवले पाहिजे. मग तुम्ही कोणतेही औचित्य साधा, पण झाडे लावा. तुमचे एक झाड सर्वांचे रक्षण करण्यासाठी तत्परतेने आणि खंबीरतेने दंड थोपटून उभा असेल... तुमचं सुदृढ जीवन अबाधित ठेवण्यासाठी झाडांकडून खात्री नक्कीच पटेल. मग काय, कसला विचार करता? झाडे लावून सुंदर जगा. कारण या धरतीचे रखवाले तुम्हीच आहात.

**- गोविंद कवळे**
इळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड
मो. ७३८७२६७२१९

# मुक्त विद्यापीठाच्या रोजगार मेळाव्यात अनेक युवकांना ३५ नामांकित कंपन्यांकडून तत्काळ नियुक्तीपत्रे

**नांदेड (प्रतिनिधी)–** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, विभागीय केंद्र नांदेड व युवाशक्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या मेळाव्यात शेकडो बेरोजगार युवक-युवतींना महाराष्ट्रातील नामांकित तसेच आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या.




या मेळाव्यासाठी सुमारे १३०० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली होती. पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर, अमरावती, रांजणगाव आदी औद्योगिक शहरांतील सुमारे ३५ प्रतिष्ठित कंपन्यांनी सहभाग नोंदवला. मुलाखतीत पात्र ठरलेल्या अनेक उमेदवारांना कंपन्यांकडून तत्काळ नियुक्तीपत्रेही देण्यात आली.

कार्यक्रमास विद्यापीठाच्या ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखेचे संचालक प्रा. कैलास मोरे, युवाशक्ती फाउंडेशनचे संचालक डॉ. सतीश पवार, झोनल मॅनेजर आनंद मिरगे, नांदेड विभागीय केंद्राचे वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ. यशवंत कलेपवार तसेच छत्रपती संभाजीनगर येथील वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ. नंदकुमार राठी आदी मान्यवर उपस्थित होते.

मुक्त विद्यापीठाच्या वतीने राज्यभरात आतापर्यंत एकूण ११ रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले असून सुमारे २३ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी सुमारे १२०० बेरोजगार युवकांना विविध कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली. पुढील काळातही राज्यभर टप्प्याटप्प्याने रोजगारविषयक कार्यशाळा व मेळावे आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

मेळावा यशस्वी करण्यासाठी विभागीय केंद्रातील दिलीप थोरात, डॉ. दिग्विजय देशमुख, विकास पावडे, नितेश देशमाने, राजू खरपडे, सुरज गायकवाड, माधव वैद्य, अक्षय गिरे, मुंजाजी कदम, गजानन कोकाटे, शिवानंद गिरे, भावेश देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गजानन इंगोले यांनी केले तर उपस्थितांचे आभार राजू खरपडे यांनी मानले.

# नांदेड पतंजलीतर्फे श्रीराम जन्मोत्सव साजरा

## विद्यालय व महाविद्यालयाच्या मुलांकडून यज्ञ

**नांदेड (प्रतिनिधी)–** श्रीकृष्ण मंदिर काबरा नगर येथे विद्यालय व महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांद्वारे अकरा कुंडी यज्ञ करून श्रीराम नवमी व स्वामी रामदेव महाराज यांचा संन्यास दीक्षा दिवस गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ रोजी साजरा करण्यात आला.

भगवान श्रीराम जन्मोत्सवाचे औचित्य साधून पतंजली योग परिवारातर्फे मुला-मुलींना यज्ञ चिकित्सा पद्धतीचे महत्त्व सांगून मुलांकडून यज्ञ करून घेण्यात आले. तसेच उपस्थिततांना घरी यज्ञ करण्यासाठी गोमय यज्ञकुंड, संविधा व हवन सामग्री देण्यात आली.

नारायणराव कुलकर्णी यांनी हिंदू संस्कृतीत यज्ञाचे महत्त्व असल्याचे सांगितले. आपले पूर्वज नियमित यज्ञ करत होते, यज्ञ करण्याने वातावरण शुद्ध होते असे म्हणाले.

यावेळी राम शिवपनोर म्हणाले की, नियमित यज्ञ केल्याने वातावरणात सकारात्मक ऊर्जेचा संचार होतो. मानसिक शांती लाभते. वायुमंडळात ऑक्सिजनचे स्तर वाढते. नंदिनीताई चौधरी म्हणाल्या, यज्ञ ही एक चिकित्सा पद्धती आहे. आपले पूर्वज यज्ञाद्वारे देवतांना प्रसन्न करत होते. यज्ञ केल्याने समाजात आपसातील प्रेम व आपुलकीची भावना वाढते असे गंगुबाई मारपल्ले यांनी सांगितले.

याप्रसंगी बोलताना सुरेश लंगडापुरे म्हणाले की, यज्ञात दिलेली आहुती हजारो पटीने आपल्याला अग्नीदेवता परत देते. जसा रोग आहे तसा जडीबुटीची आहुती देऊन यज्ञाद्वारे रोग ठीक करता येतो.

याप्रसंगी सर्वश्री पंढरीनाथ कंठेवाड, नारायण कुलकर्णी, राम शिवपनोर, नंदिनी चौधरी, महारुद्र माळगे, सदाशिव बुटले पाटील, अवधूत गिरी, दिलीप माने, शिवाजीराव शिंदे हळदेकर, सुरेश लंगडापुरे, हनुमंत ढगे, सविता गवाळे, महानंदा माळगे, सुरेश कुलकर्णी, प्रतिभा पाटील, पंडित पाटील, अनिल कामिनवार, लक्ष्मीकांत रुघे, हरिहर नरवाडे, मोहन गुरमे, राणी दळवी, चंदा हळदे, भाग्यश्री असोरे, यादव भांगे, किशन भवर, गंगुबाई मारपल्ले, अनिल कदम, विष्णुदास शिंदे, मंगला पाटील, दिगंबर पाटील, अशोक कुरडे, शंकर महाजन, सौ. महाजन, सविताबाई मेढे, रुक्मिणी मुरमुरे, सिंधुताई क्षीरसागर, दिगंबर क्षीरसागर, केरबा जाधव, पुष्पा जाधव, कौशल्य शर्मा, सोनी डफडे, बालाजी डफडे, राजेश टेकाळे, चित्रा कंधारकर, रवींद्र कंधारकर, तारा दळवी, सुषमा लबडे, शोभाताई चेरला, शोभाताई मुदीराज, संगीता भोंग, शिवपुजेताई, सरोज मारेवार, सरोज गोपीवार, लता सरोदे, गायत्री देशपांडे, वेदिका क्षीरसागर, रमेश पुंड, बेबीताई, उत्तम साठे, मंगला चमकुरे, दीपा चमकुरे, निशा चमकुरे तसेच शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी प्रियल गुरमे, स्वरा डफडे, शिवेंद्र डफडे, आराध्या शिरसाट, देवयानी गिरी, श्रीपाद गिरी, अर्णव भुरेवार, गौरव रुघे, शिवराम पुरी, स्वरा देशमुख, सृष्टी सांगळे, अन्वी चोपकर, श्रेयश लंगडापुरे, अथर्व पाटील, श्रेया पाटील, रेयांश चव्हाण, श्रेयश पाटील, अधीक्षि बोबडे, जानवी शिंदे, स्वरा जाधव, सिद्धी सांगळे, भक्ती देशमुख, केदार सरकाळे, अस्था गायकवाड, रिदम स्वामी, सुमेधा सूर्यवंशी आदींची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महारुद्र माळगे यांनी केले. या कार्यक्रमासाठी आर्थिक सहाय्य पीपल्स हायस्कूल नांदेड १९७७ दहावीच्या विद्यार्थी दुर्गादास कुलकर्णी, श्रीकांत अकोलकर, व्यंकटेश कवटेकवार, बालाजी गिरी, प्रमोदिनी डिग्गीकर, कल्पना व्याहाळकर आदींनी मदत केली असे अनिल अमृतवार यांनी सांगितले.

# बोरी येथे महादेव यात्रेनिमित्त पशुप्रदर्शन व कुस्त्यांची दंगल

**नांदेड (प्रतिनिधी) –**कंधार तालुक्यातील मौ. बोरी बु. येथे श्री महादेवाच्या यात्रेनिमित्ताने पशुप्रदर्शन व कुस्त्यांची दंगल व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची उपस्थिती राहणार असून, मान्यवरांच्या उपस्थितीत २९ मार्च रोजी पशुप्रदर्शन व रात्री ८ वाजता महादेवाचे लग्न, ३० मार्च रोजी आ. चिखलीकर यांच्या उपस्थितीत हेलिकॉप्टरने शंभू महादेव मंदिरावर पुष्पवृष्टी व ९ वाजता फटाक्यांची आतीषबाजी व रात्री सौभाग्य नाही मज नशिबी या नाटकाचा प्रयोग होणार आहे. ३१ मार्च रोजी कुस्त्यांची दंगल होणार आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मौजे बोरी (बु.) ता. कंधार येथे श्री महादेवाच्या यात्रेनिमित्त रविवार, दि. २९ मार्च २६ सकाळी १० वा. पासून पशुप्रदर्शन व रात्री ८ वाजता श्री महादेवाचे लग्न आणि सोमवार, दि. ३० मार्च २६ दु. १२ वा. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते हेलिकॉप्टरमधून शंभू महादेवाच्या मंदिरावर पुष्पवृष्टी करण्यात येणार असल्याचे संयोजकांनी कळविले आहे.

# किनाळा येथे महादेव यात्रेनिमित्त ३० मार्च रोजी कुस्त्यांची दंगल व रक्तदान शिबिराचे आयोजन

**शंकरनगर (प्रतिनिधी) –**बिलोली तालुक्यातील किनाळा, धुप्पा आणि हिप्परगा माळ या तीन गावांच्या सीमेवर असलेले महादेव मंदिर हे परिसरातील भाविकांचे प्रमुख श्रद्धास्थान आहे. या मंदिराच्या यात्रेनिमित्त सोमवार, दि. ३० मार्च रोजी कुस्त्यांची दंगल व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या यात्रेस भाविक, यात्रेकरू, कुस्तीपटू तसेच रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन यात्रा संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

२९ मार्चला पालखी सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रमाने यात्रेला सुरुवात, २९ मार्च रोजी सायंकाळी किनाळा, हिप्परगा माळ व धुप्पा या तिन्ही गावांतून महादेवाची काठी (पालखी) मोठ्या भक्तिमय वातावरणात मंदिराकडे आणण्यात येणार आहे.

टाळ-मृदंगाच्या नादात व हर हर महादेवच्या गजरात पालखीचे आगमन होऊन त्यानंतर पारंपरिक गोंधळी कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे.

३० मार्च रोजी दुपारी ३ वाजता कुस्त्यांची दंगल आयोजित करण्यात आली आहे. या यात्रेस पंचक्रोशीतील अनेक गावांमधून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे परिसरातील पैलवानांनीही या कुस्त्यांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

यात्रेस येणाऱ्या भाविकांना पिण्याच्या पाण्याची अडचण भासू नये म्हणून कै. संजय खराटे मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी थंड पाण्याची (पानपोई) व्यवस्था करण्यात येणार आहे.

रक्तदान हेच श्रेष्ठ दान या संदेशातून प्रेरित होऊन कै. संजय खराटे मित्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. गरजू रुग्णांना वेळेवर रक्त मिळावे या उद्देशाने परिसरातील रक्तदात्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. यात्रा यशस्वी करण्यासाठी चेअरमन गोविंदराव भोसले, सरपंच विठ्ठल माने, उपसरपंच बालाजी भोसले, किशनराव भोसले, रावसाहेब मोहिते, व्यंकटराव शेळगावे, भुजंगराव भोसले, पंडित मोहिते, नागेश मोहिते, शिवकांत महाराज नंदे, गजू भोसले आदींसह ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

# आत्मसंरक्षणातून आत्मविश्वासाकडे राणी लक्ष्मीबाई योजनेतून नांदेडमधील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

**नांदेड (प्रतिनिधी)–** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देत त्यांना शारीरिकदृष्ट्या सक्षम, मानसिकदृष्ट्या मजबूत आणि आत्मविश्वासपूर्ण बनविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने नांदेड येथे आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून 'राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण योजना' अत्यंत यशस्वीपणे राबविण्यात आली. दि. १२ मार्च ते २५ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या दहा दिवसीय प्रशिक्षण उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये आत्मसंरक्षणा-बरोबरच सकारात्मक जीवनदृष्टी विकसित करण्याचे कार्य केले.




या उपक्रमात नांदेड येथील राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा पालन समूहाचे सदस्य तथा आर्ट ऑफ लिव्हिंग प्रशिक्षक गोविंद दिगंबरराव जोशी यांच्या उपस्थितीत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र. १३, महेबुबिया कॉलनी, नांदेड तसेच ज्योतिबा फुले सेवा ट्रस्ट संचलित निवासी अंध विद्यालय, वसरणी व जिल्हा परिषद हायस्कूल इतवारा या तीन शैक्षणिक संस्थांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

नां. वा. श. महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र. १३, महेबुबिया कॉलनी येथील इयत्ता ५ ते ८ पर्यंतच्या उर्दू माध्यमातील १०६ विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. शाळेचे मुख्याध्यापक शेख रहीम तसेच शिक्षकवृंद गजाता बेगम, नाजीया बेग, नूरजहाँ बेगम, फरहीन बानू, इकबाल फातेमा, बाबू खान पठाण यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. या उपक्रमासाठी नांदेड वाघाळा महानगरपालिका शिक्षणाधिकारी लाबडे तसेच माजी महिला व बालकल्याण सभापती सौ. अपर्णा हृषीकेश नेरलकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

वसरणी येथील निवासी अंध विद्यालयातील ४५ विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला. या विद्यालयाचे मुख्याध्यापक बाबाराव माधवराव इबितवार, वसतिगृह अधीक्षक मनोजकुमार माधवराव कलवले, संगीत शिक्षक पंकज वसंतराव शिरभाते तसेच सहयोगी शिक्षक सुरेश नागोराव होळंबे, रामराव लक्ष्मण जोजार, बलभीम ग्यानोबा केंद्रे, भास्कर गंगाधर आणेराव, सौ. वसुधा विश्वनाथ निकम व इतर कर्मचाऱ्यांनी उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

जिल्हा परिषद हायस्कूल, इतवारा येथील विद्यार्थ्यांनी देखील या प्रशिक्षणात सहभाग घेतला. शाळेचे मुख्याध्यापक सतीश अर्धापुरे तसेच शिक्षक संजय कोल्हे, डॉ. वैजनाथ हंगरगे, गफार चौधरी, असद बेग, यास्मिन खान, जमील, मोशिन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणामध्ये आत्मरक्षण तंत्रांसोबत योग, प्राणायाम व ध्यान यांचा समावेश करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर देण्यात आला. योगाभ्यासामुळे शरीर सुदृढ झाले, प्राणायामामुळे मन स्थिर झाले आणि ध्यानामुळे एकाग्रता व आत्मविश्वास वाढल्याचे अनुभव विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

# के. आर. एम. महिला महाविद्यालयात 'संभाषण कौशल्य काळाची गरज' विषयावर व्याख्यान संपन्न




**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड येथील के. आर. एम. महिला महाविद्यालयात संभाषण कौशल्य : काळाची गरज या विषयावर प्रा. डॉ. राहुल धावारे यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विजया देशमुख ह्या होत्या.

यावेळी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. भगवान गुंजलवाड, प्रा. डॉ. मेघराज पवार इतर सर्व प्राध्यापक तसेच महाविद्यालयातील असंख्य विद्यार्थिनी उपस्थित होत्या. व्याख्यानात प्रा. डॉ. राहुल धावारे यांनी आधुनिक काळात इंग्रजी संभाषण कौशल्याचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषा आत्मसात करणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्या डॉ. विजया देशमुख यांनी इंग्रजी भाषेमुळे विविध क्षेत्रांमध्ये करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध होतात, त्यामुळे विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवावे, असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मेघराज पवार यांनी केले, तर इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. भगवान गुंजलवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# 'एमजीएम'मध्ये शहीद दिन कार्यक्रम संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील एमजीएम कॉलेजमध्ये शहीद दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपस्थितांनी शहीदांना अभिवादन केले.

दि.२३ मार्च हा दिवस देशासाठी बलिदान दिलेल्या वीरांना आदरांजली देण्यासाठी भारतात दरवर्षीच पाळण्यात येतो. त्या अनुषंगाने एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयात संचालिका डॉ. गीता लाठकर यांच्या मार्गदर्शनात शहीद दिन पाळण्यात आला.

एमजीएम महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिरिष कोटगिरे यांनी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी महाविद्यालयातील अनेक उपस्थितांनी हुतात्म्यांच्या प्रतिमेस फुले अर्पण केली. यावेळी प्रा. विठ्ठल जाधव, डॉ. गोविंद हंबर्डे, डॉ. भाग्यश्री कापरे यांच्यासह प्राध्यापक व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# नांदेडमध्ये ड्रायलँड रिसर्च सेंटर स्थापन होणार : खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या प्रश्नांवर केंद्रीय कृषिमंत्र्यांची सकारात्मक भूमिका

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेडसह मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त आणि निसर्गावर अवलंबून असलेल्या शेतीविषयी आज राज्यसभेत खा. डॉ. अजित गोपछडे यांनी चर्चा घडवून आणली. मराठवाड्याच्या कृषी समस्यांकडे लक्ष वेधताना, कमी पर्जन्यमान आणि कमी जलधारण क्षमता लक्षात घेऊन नांदेड येथे ड्रायलँड रिसर्च सेंटर स्थापन करण्याची मागणी त्यांनी केली.



या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी अशा संशोधन केंद्राच्या स्थापनेसाठी केंद्र सरकार सकारात्मक प्रयत्न करेल, असा विश्वास दिला.

मराठवाड्यातील विकासाचा अनुशेष अद्याप पूर्ण भरून न निघाल्याने शाश्वत शेतीला अपेक्षित बळकटी मिळालेली नाही. परिणामी, शेती मोठ्या प्रमाणात निसर्गावर अवलंबून असून उत्पादनात घट आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीत अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे मराठवाडा आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागे राहिल्याचे चित्र दिसते.

ही परिस्थिती लक्षात घेऊन मराठवाड्यातील शेतीला चालना मिळावी आणि शेतकऱ्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी हा मुद्दा प्रभावीपणे मांडला. हैदराबाद येथील संस्थेपर्यंत शेतकऱ्यांची मर्यादित पोहोच लक्षात घेता, नांदेड येथे Central Research Institute of Dryland griculture (CRID) ची शाखा स्थापन केल्यास स्थानिक पातळीवर तांत्रिक मार्गदर्शन मिळून शेतकऱ्यांच्या समस्यांवर कायमस्वरूपी उपाय होऊ शकतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# कल्याणकारी मंडळाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी) –**संपूर्ण महाराष्ट्रात सन २०२४ पासून धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र ऑटो आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची स्थापना केली आहे. या मंडळाच्या विविध योजनांचा लाभ मिळवण्यासाठी ऑटोरिक्षा व मीटर्ड टॅक्सी चालकांनी ऑनलाईन नोंदणी करावी व या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनय अहिरे यांनी केले आहे.

वय ६५ वर्षावरील चालकांसाठी सन्मान निधी योजना, जीवन विमा व अपंगत्व विमा योजना कर्तव्यावर असताना, आरोग्यविषयक लाभ योजना, कर्तव्यावर असताना दुखापत झाल्यास अर्थसाहाय्य योजना, पाल्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे.

धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र ऑटो आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाच्या अधिकृत बेवसाईटची लिंक https://anand dighe kalyankarimandal. org आहे. या लिंकद्वारे रिक्षाचालक आणि टॅक्सीचालक सभासद नोंदणीसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करु शकतात. नांदेड जिल्ह्यातील सर्व रिक्षाचालक आणि टॅक्सीचालक संघटना तसेच रिक्षाचालक आणि टॅक्सी चालक यांनी अधिकृत लिंकद्वारे सभासद नोंदणीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत.

सभासद नोंदणी पुढीलप्रमाणे करावी. वाहन मालकाचे नाव, वाहनाचा नोंदणी क्रमांक, परवाना क्रमांक, अनुज्ञप्ती क्रमांक तसेच कुटुंबातील सदस्यांची माहिती, रेशन कार्ड, पॅनकार्ड, आधारकार्ड, इत्यादीची माहिती भरुन आवश्यक कागदपत्राची प्रत अपलोड करावी. अर्जातील माहिती तपासून सर्व अटीची पुर्तता झाल्यास अर्ज मंजूर केला जातो. अर्जामध्ये त्रुटी असल्यास कार्यालयास संपर्क साधा, असा संदेश प्राप्त होतो. अशा वेळी प्रादेशकि परिवहन कार्यालयाशी तत्काळ संपर्क साधून त्रुटीची पुर्तता करुन घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे .

# 'शंभर दिवसीय' क्षय रुग्ण शोध मोहिमेस सहकार्य करावे -जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. कोपूरवाड

**नांदेड (प्रतिनिधी)–** 'शंभर दिवसीय' क्षयरुग्ण शोध मोहिमेस २४ मार्च जागतिक क्षयरोग दिनापासून सुरुवात झाली असून, या मोहिमेत जिल्ह्यातील अति जोखीमग्रस्त भागातून विशेष मोहिमेअंतर्गत संशयीत क्षय रुग्णांना शोधून त्यांचे थुंकी नमुने घेण्यात येणार आहेत. यातून निदानीत होणाऱ्या क्षयरूग्णांना क्षयरोग प्रतिबंधीत औषधोपचाराने रोगमुक्त करणे उद्दिष्ट आहे. या मोहिमेत नागरिकांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांनी केले.

जागतिक क्षयरोग दिना-निमित्त जिल्हा क्षयरोग केंद्र नांदेड येथे आयोजित एका विशेष कार्यक्रमांतर्गत डॉ. सतीश कोपूरवाड हे बोलत होते.

ते पुढे मार्गदर्शन करताना म्हणाले की, संशयित क्षय रुग्ण म्हणजे ज्या व्यक्तीस दोन आठवडेपेक्षा जास्त दिवसाचा खोकला, रात्रीचा येणारा हलकासा ताप, वजनात घट होणे, भूक मंदावणे, थुंकीवाटे रक्त पडणे असे असल्यास सदर व्यक्तीने आपल्या नजीकच्या सरकारी दवाखान्यात जाऊन आपल्या थुंकीची तपासणी करून घेणे आवश्यक आहे, असे सांगितले.

वैद्यकीय अधिकारी डॉ. अमृत चव्हाण यांनी याप्रसंगी सांगितले की, क्षयरुग्णाने पूर्ण कालावधीचा औषधोपचार घेणे आवश्यक असून, अर्धवट औषधोपचार घेतल्यास सदर रुग्ण एमडीआर व एक्सडीआर सारख्या घातक क्षयरोगाला आमंत्रण देतो हे उदाहरणे देवून पटवून दिले. डॉ. गणपत मीरदुडे यांनीही याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले.

सदर १०० दिवसीय क्षयरुग्ण शोध मोहीम जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येत आहे.

# शिवा संघटनेची महात्मा बसवेश्वर जयंतीच्या पूर्वतयारीसाठी आज बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)–** महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीच्या पूर्वतयारीसाठी शिवा संघटनेची बैठक बोलावण्यात आली आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांची ८९५ वी जयंती नांदेड शहरात शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांच्या नेतृत्वात उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. या जयंतीच्या पूर्वनियोजनाची बैठक शनिवार, दि. २८ मार्च रोजी दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीचे अध्यक्ष वैजनाथ तोनसुरे राज्य उपाध्यक्ष शिवा संघटना महाराष्ट्र, प्रमुख मार्गदर्शक शिवा संघटनेचे प्रदेश प्रवक्ते विठ्ठलराव ताकबिडे राज्य सरचिटणीस संजय कोठाळे, नांदेडचे जिल्हा संपर्कप्रमुख इंजि. अनिल माळगे, मराठवाडा उपाध्यक्ष दिगंबर मांजरमकर, मराठवाडा संघटक डॉ. वैजनाथ हंगरगे यांच्या उपस्थित संपन्न होणार आहे.

# जिल्हा कोषागार कार्यालयात पदोन्नती सोहळा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी) –**येथील जिल्हा कोषागार कार्यालयात कार्यरत असलेले शरद कपाळे यांच्या उत्कृष्ट कामाची योग्य दखल घेऊन उपकोषागार अधिकारी तथा वरिष्ठ लेखापाल या पदावर जिल्हा कोषागार कार्यालय, नांदेड येथे पदोन्नती करण्यांत आली.

शरद कपाळे यांच्यासोबत बालाजी देशमाने, बालाजी मंगनाळे, अजय सीताफुले, लिंगानंद भुरे यांनाही पदोन्नती देण्यात आली आहे.

या सर्व पदोन्नत कर्मचाऱ्यांचा प्रवीण पडलवार, प्रणव मेश्राम, जिल्हा हिवताप, हत्तीरोग नियंत्रण पथक, नांदेड कार्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक कैलाश सावळे, सत्येजत टिप्रेसवार, सहायक अधीक्षक विजय चव्हाण, भास्कर पाटील शिंदे, बालाजी केंद्रे, सुरेश पिंपळगावकर, वैजनाथ सावरकर, पांडूरंग बोरकर, परमेश्वर मठदेवरु, कैलाश कुंटूरवार आदी मान्यवर उपस्थित होते.

CMYK

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## आठ मेनंतर चॅटिंगचे बदलणार जग..!

### दोघांच्या मध्ये राहणार ‘तिसरी व्यक्ती’

**इंस्टाग्रामवर चॅटिंग करणे आता लोकांसाठी धोकादायक ठरू शकते. मेटाने जाहीर केले आहे की ते लवकरच DMs साठी एंड-टू-एंड एन्क्रिप्टेड (E2EE) सपोर्ट बंद करणार आहे. इंस्टाग्रामने आपल्या सपोर्ट पेजवर सांगितले आहे की, हे फीचर ८ मे २०२६ नंतर उपलब्ध राहणार नाही. याचा अर्थ असा की, ८ मेपासून इंस्टाग्राम डायरेक्ट मेसेजेससाठी E2EE फीचर उपलब्ध राहणार नाही. हे फीचर दोन वापरकर्त्यांमधील संभाषण सुरक्षित ठेवते आणि ते कंपनीसह कोणालाही वाचता येत नाही. हे फीचर काढून टाकल्यामुळे गोपनीयतेबद्दल चिंता निर्माण होऊ शकते. त्यामुळे मे महिन्यापासून इंस्टाग्रामवर चॅटिंग करताना वापरकर्त्यांना काही गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतील, जेणेकरून त्यांचे संभाषण खासगी राहील.**

कंपनीचे म्हणणे आहे की, हा बदल लागू होण्यापूर्वी वापरकर्त्यांना कोणतेही मीडिया किंवा मेसेज कसे डाउनलोड करायचे याबद्दल सूचना दिसतील. याव्यतिरिक्त, इंस्टाग्रामच्या जुन्या आवृत्त्या वापरणाऱ्यांना त्यांचे एन्क्रिप्टेड मेसेज किंवा मीडिया डाउनलोड करण्यासाठी त्यांचे ॲप अपडेट करावे लागेल. इंस्टाग्रामच्या सपोर्ट पेजवर एंड-टू-एंड एन्क्रिप्टेड DMs साठीचा सपोर्ट का बंद केला जात आहे, याचे स्पष्टीकरण दिलेले नाही. मेटाच्या एका प्रवक्त्याने स्पष्ट केले की, फार कमी लोक DMs मध्ये E2EE वापरत होते आणि ज्यांना हे फीचर वापरणे सुरू ठेवायचे आहे, ते व्हॉट्सॲपवर तसे करू शकतात.

#### या गोष्टी लक्षात ठेवा

८ मेनंतर इंस्टाग्रामवर तुमच्या मित्रांशी चॅटिंग करताना, पासवर्ड किंवा वैयक्तिक तपशील यांसारखी कोणतीही गोष्ट शेअर न करण्याची काळजी घ्या. जी चुकीच्या हातात पडल्यास तुमच्यासाठी हानिकारक ठरू शकते. सांकेतिक शब्दांचा वापर करून संवाद साधण्याचा प्रयत्न करा. इंस्टाग्राम व्हॅनिश मोडची सुविधा देते. मेसेज वाचल्यानंतर आणि चॅट विंडो बंद केल्यावर ते आपोआप डिलीट होतात. यामुळे मेसेज सर्व्हरवर राहतील, पण तुमचा किंवा तुमच्या मित्राचा फोन चोरीला गेल्यास, जुने चॅट्स कोणीही वाचू शकणार नाही. तुम्हाला महत्त्वाचे फोटो किंवा कागदपत्रे पाठवायची असल्यास ती व्ह्यू वन्समध्ये पाठवा. हे पूर्णपणे सुरक्षित नाही, पण साध्या मजकुरापेक्षा हे चांगले आहे.



## तारीख पे तारीख...

### एसीची एक्सटेंडेड वॉरंटी आहे की फसवणूक? ग्राहकाचा दावा : कंपनी करतेय स्कॅम!

**आजकाल बहुतेक कंपन्या एसीसोबत एक्सटेंडेड वॉरंटी देतात. नवीन एअर कंडिशनर खरेदी करताना ग्राहकांना एक्सटेंडेड वॉरंटी मिळते. तथापि, यासाठी जास्त शुल्क आकारले जाते. उदाहरणार्थ, जर कंपनी तुमच्या एसीसोबत दोन वर्षांची वॉरंटी देत असेल, तर तुम्ही अतिरिक्त शुल्क भरून तीन वर्षांची एक्सटेंडेड वॉरंटी मिळवू शकता. यामुळे तुमच्या एसीची एकूण वॉरंटी पाच वर्षांपर्यंत वाढते. या पाच वर्षांच्या कालावधीत एसीमध्ये कोणताही दोष आढळल्यास कंपनीकडून त्याची दुरुस्ती विनामूल्य केली जाईल.**



ॲमेझॉन आणि फ्लिपकार्टसारखे ऑनलाइन प्लॅटफॉर्मदेखील एक्सटेंडेड वॉरंटी देतात. प्रदूषण आणि दूषित पाण्यामुळे आजकाल एसी खराब होण्याची शक्यता जास्त असल्याने लोक अनेकदा या वॉरंटी घेतात. तथापि, कधीकधी या ऑफर्स एक घोटाळा ठरू शकतात. अलीकडेच, एका ग्राहकाने एक्सटेंडेड वॉरंटीच्या नावाखाली फसवणूक झाल्याबद्दल सोशल मीडियावर लिहिले. सर्व्हिसची वेळ ठरवूनही, अनेकदा त्यांच्या एसीची सर्व्हिसिंग केली जात नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

#### फ्लिपकार्टचा नवा घोटाळा

ई-कॉमर्स वेबसाइट्स फ्लिपकार्ट आणि ॲमेझॉन उन्हाळ्याच्या हंगामात एसीवर चांगल्या ऑफर्स देतात. परिणामी, अनेक लोक ऑफलाइनऐवजी ऑनलाइन एसी खरेदी करतात आणि एक्सटेंडेड वॉरंटीचाही लाभ घेतात. फ्लिपकार्टचे ग्राहक अशोक मोर यांनी एका नव्या घोटाळ्याबद्दल ट्विट केले आहे. १,६०,००० सबस्क्राइबर्स असलेल्या या यूट्यूब कंटेंट क्रिएटरने लिहिले, की मला फ्लिपकार्टवर आणखी एक घोटाळा आढळला. सर्व्हिसचे वेळापत्रक वारंवार बदलले जात आहे. त्यांनी सांगितले की, त्यांनी दोन वर्षांपूर्वी एक एसी खरेदी केला आणि वनअसिस्ट (OneAssist) द्वारे तीन वर्षांची एक्सटेंडेड वॉरंटी घेतली. आता, जेव्हाही त्यांना एसीची सर्व्हिसिंग करायची असते, तेव्हा त्यांना त्याचे वेळापत्रक वारंवार बदलावे लागते. 24x7 सपोर्टचा दावा करून फक्त चॅटबॉट उपलब्ध आहे. ॲपमध्ये लॉग इन करण्यासाठी खूप वेळ लागतो. त्यामुळे, फ्लिपकार्टवरून सेवा घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना पुन्हा एकदा अडचणींचा सामना करावा लागत आहे.

## कॉलदरम्यान 5G गायब होते का?




### या सेटिंग्ज त्वरित बदला अन् प्युअर 5G वापरून पहा...




**तुमच्या फोनमध्येही कॉल दरम्यान 5G गायब होते का? या दरम्यान, इंटरनेट एकतर अनुपलब्ध होते किंवा ते 4G वर जाते. असे झाल्यास तुम्ही शुद्ध 5G वापरत नाहीत, हे लक्षात घ्या. आतापर्यंत, तुम्ही इंटरनेट ॲक्सेससाठी फक्त 4G किंवा 5G वापरले आहे आणि कॉल्स 4G किंवा 4G LTE द्वारे केले जात होते. आता, तुमची इच्छा असल्यास तुम्ही VoNR सेटिंग वापरून तुमचे कॉल्स पूर्णपणे 5G गुणवत्तेवर स्विच करू शकता. यामुळे कॉल दरम्यान 5G गायब होण्याची किंवा इंटरनेट 4G वर जाण्याची समस्या दूर होईल. VoNR चा सर्वात मोठा फायदा हा आहे की ते चालू केल्यानंतर, तुमचे कॉल्स पूर्णपणे शुद्ध 5G नेटवर्कवर हस्तांतरित होतील आणि त्यांची गुणवत्ता पूर्वीपेक्षा चांगली असेल.**

- VoNR सेटिंग काय आहे? : VoNR किंवा व्हॉइस ओव्हर न्यू रेडिओ हे एक तंत्रज्ञान आहे जे व्हॉइस कॉल्स करण्यासाठी 5G नेटवर्क वापरते. हे विशेषतः 5G इन्फ्रास्ट्रक्चरकरिता डिझाइन केलेले आहे. 5G नेटवर्क वापरल्यामुळे कॉल चालू असताना फोन 4G नेटवर्कवर स्विच होत नाही. यामुळे कॉल कनेक्शनचा वेग लक्षणीयरीत्या सुधारतो. शिवाय, आवाजाची गुणवत्ता अगदी स्पष्ट आणि सुस्पष्ट होते. यालाच खरा 5G अनुभव मानले जाते. याचा आणखी एक मोठा फायदा म्हणजे, यामुळे तुम्हाला कॉल चालू असतानाही 5G इंटरनेट वापरता येते. सामान्यतः, तुम्ही वायफायशी कनेक्ट असाल किंवा तुमच्याकडे इंटरनेट सक्षम असलेले दुसरे सिम कार्ड असेल तरच कॉल चालू असताना इंटरनेट वापरता येते.
- अँड्रॉइड फोनवर VoNR कसे सक्षम करावे? : अँड्रॉइड स्मार्टफोनवर VoNR सक्षम करण्यासाठी, सर्वप्रथम तुमच्या फोनच्या सेटिंग्जमध्ये जा. त्यानंतर कनेक्शन्स किंवा नेटवर्क आणि इंटरनेटवर क्लिक करा. सिम कार्ड आणि मोबाईल नेटवर्क्स किंवा मोबाईल नेटवर्क निवडा. पुढे, ज्या 5G सिमवर तुम्हाला VoNR सक्षम करायचे आहे ते निवडा आणि पसंतीच्या नेटवर्क प्रकाराखाली (Preferred Network Type) 5G (ऑटो) निवडा. खाली स्क्रोल करा आणि जिथे VoNR पर्याय दिसेल तो चालू करा. यानंतर, तुमचा फोन नक्की रीस्टार्ट करा.
- आयफोनवर VoNR कसे सक्षम करावे? : तुमच्या आयफोनच्या सेटिंग्जमध्ये जा. मोबाईल सर्व्हिसवर टॅप करा. त्यानंतर व्हॉइस अँड डेटा पर्यायावर क्लिक करा. 5G ऑन किंवा 5G ऑटो निवडलेले असल्याची खात्री करा. या स्क्रीनच्या तळाशी, तुम्हाला VoNR किंवा 5G स्टँड अलोन पर्याय दिसेल; तो चालू करा. लक्षात ठेवा की VoNR सेवा केवळ 5G फोनवर आणि 5G सेवा उपलब्ध असलेल्या भागातच उपलब्ध असेल. शिवाय, ही सेवा सध्या जिओ आणि एअरटेल ग्राहकांसाठी उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत, तुम्ही या नेटवर्क प्रदात्यांचे सिम कार्ड वापरल्यासच VoNR चा लाभ घेऊ शकता. ही सेवा सक्रिय करण्यासाठी आणि वापरण्यासाठी तुमच्या फोन नंबरवर सक्रिय रिचार्ज असणे देखील आवश्यक आहे.

# अजब-गजब

## तो जिथे उभा राहायचा, तिथे टपकायचे पाणी!

**लंडन :** डॉनी डॉकर... अजब रहस्यमयी व्यक्ती. तो जिथे कुठे उभा राहायचा पाणी टपकणे सुरू व्हायचे. पाऊस पाडणाऱ्या डॉनीचे रहस्य त्याच्या संपूर्ण आयुष्यात कधीच समोर येऊ शकले नाही. १९८३ ची घटना आहे. अमेरिकेचा डॉनी जिथेही जायचा तिथे पाऊस पडू लागायचा. पॅनस्लिवेनियाच्या स्ट्राऊडसबर्गमध्ये राहणाऱ्या डॉनीला त्याच्या आजोबाच्या मृत्यूनंतर अंत्यसंस्काराला उपस्थित राहता यावे म्हणून जेलमधून सोडले गेले होते. त्यानंतर त्याने आपले मित्र बॉब आणि जिनी कीफरसोबत राहण्याचा निर्णय घेतला. एका संध्याकाळी कीफरच्या घरात डॉनीच्या वरून काहीतरी पडले. पण त्याने तिकडे लक्ष दिले नाही. बॉब आणि जिनी हेही आपल्या कामात व्यस्त होते. तितक्यात खोलीत पाऊस होऊ लागला. त्यांना वाटले पाण्याचा पाईप वगैरे फुटला असेल. त्यांनी तातडीने घरमालकाकडे तक्रार केली. रॉन यांनी तपासणी केली तेव्हा समोर आले की त्यांच्या खोलीच्या वरून कोणताही पाईप गेलेला नाही. आणखी एक रहस्यमयी गोष्ट म्हणजे त्यानंतर काही वेळाने पाणी केवळ छतातून पडत नव्हते तर खालून वर आणि आडवाही वाहत होता. हे पाहून घाबरलेल्या घरमालकाने पोलिसांना बोलावले. पण तेही काहीच करू शकले नाहीत. यानंतर डॉनी आणि त्याचे मित्र जेवणासाठी बाहेर गेले. ते जाताच घरात टपकणारे पाणी बंद झाले. हे तिघेही एका रेस्टॉरंटमध्ये गेले. पण रेस्टॉरंटमध्येही पाणी टपकू लागले. डॉनीला भूतबाधा झाल्याचा संशय सर्वांना आला. त्यामुळे त्याच्या मित्रांनी त्याच्या हाती क्रॉस दिले. त्याबरोबरच डॉनीच्या शरीराची आग आग होऊ लागली. त्यानंतर ते पुन्हा कीफर्सच्या घरी आले. तिथेही पाणी टपकणे बंद होत नसल्याने पोलिसांनी त्याला पुन्हा जेलमध्ये टाकले. तिथे एका पादरीने डॉनीला भूतबाधेतून मुक्त करण्यासाठी अनेक प्रयत्न केले, पण काही केल्या पाणी टपकणे थांबत नव्हते. पादरीने डॉनीला सांगितले, की त्याच्या आजोबाची आत्मा त्याच्यात आली आहे. त्यामुळे असे होत आहे.



## मायकल जॅक्सनच्या मूर्तीमुळे जिंकायचे मॅच!



लंडन : पश्चिम लंडनच्या क्रॉवेन कॉटेज स्टेडियममधील साडेसात फुटी मायकल जॅक्सनचा पुतळा सध्या सर्वांचे आकर्षण ठरतोय खरा पण सर्वांना प्रश्न पडत आहे की खेळजगताशी मायकलचा काय संबंध? पण मायकलचा पुतळा बसविण्याचे कारण वेगळेच आहे. जेव्हाही खेळाडू ड्रेसिंग रूममधील मायकलच्या मूर्तीकडे बघायचे आणि त्याचे गाणे ऐकायचे तेव्हा त्यांचे मनोबल वाढून ते जिंकायचे. याच कारणामुळे आता ही मूर्ती स्टेडियममध्ये दर्शनी भागात लावल्याची माहिती वेस्ट लंडन फूटबॉल क्लबचे अध्यक्ष मोहम्मद अल फयाद यांनी दिली आहे.

मिस्त्रचे मोठे उद्योगपती असलेल्या मोहम्मद फयाद यांनी सांगितले, की या मूर्तीशी खेळाडूंचे भावनिक नाते तयार झाले असून, मायकल जॅक्सन यांना श्रद्धांजली म्हणून ही मूर्ती स्टेडियममध्ये ठेवण्यात आली. फूटबॉल प्रेमींना ही मूर्ती पसंत आली असली तरी काही जणांनी मात्र नाके मुरडली आहेत. त्यांच्या मते फूटबॉल खेळात योगदान देणाऱ्या एका महान खेळाडूची मूर्ती स्टेडियममध्ये हवी होती. पण मायकल जॅक्सनची ही मूर्ती अद्भूत आणि चमत्कारिक असल्यानेच ती ठेवण्यात आली, असे मोहम्मद यांनी म्हटले आहे. फूटबॉल खेळाडूंनी मायकल जॅक्सन नेहमीच प्रेरणादायी ठरत असल्याचे मान्य केले. मायकल यांना बघितल्यानंतर हुरूप येतो आणि चांगली खेळी करून आम्ही जिंकतो, असे ते म्हणाले.

## नऊ वर्षांचा मुलगा रचणार इतिहास

**मेक्सिको :** एका ९ वर्षांच्या मुलाने इतिहास रचण्याची तयारी केली असून, बोंबी ब्राडले नावाचा हा चिमुकला या आठवड्यात सेंट्रल न्यू मेक्सिकोमध्ये हॉट बलून उडविणार आहे. तो यात यशस्वी ठरला तर सर्वांत कमी वयाचा बलूनिस्ट ठरणार आहे.

बोंबीचे आई- वडील दोघेही हॉट एयर बलूनिस्ट राहिलेले आहेत. दोघांनीही अत्यंत कमी वयात बलून उडवणे सुरू केले होते. बोंबीचे पिता ट्रॉय ब्राडले यांनी सांगितले, की बोंबीने बलून उडविण्याचा विक्रम करण्यासाठी मोठा सराव केला आहे. गेल्या तीन दिवसांत त्याने ४० ते ५० वेळेस टेक ऑफ आणि लॅन्डिंगची प्रॅक्टिस केली आहे. बोंबीच्या फ्लाईटची काळजी घेण्यासाठी नियुक्त असलेले बलून एग्जामिनर रेमंड बेयर यांनी सांगितले, की बोंबी या फ्लाईटमुळे काहीच चिंतीत दिसत नाही. त्याच्या वडिलांच्या ट्रेनिंगवर त्याला पूर्ण विश्वास आहे. बोंबीचे आई-वडील दोघेही अमेरिकेचे सर्वांत प्रतिष्ठीत बलून रेसिंग स्पर्धा जिंकलेले आहेत. दोघांनी या क्षेत्रात चांगले कमावलेले आहे. आता बघायचे हे आहे की त्यांचा मुलगा काय कमाल दाखवतो..?



## अनेक वर्षांच्या मेहनतीने साकारला जगातील सर्वांत महागडा पिझ्झा

**वॉशिंग्टन :** न्यूयॉर्कच्या एका पिझ्झा कंपनीच्या मालकाने जगातील सर्वांत महागडा पिझ्झा बनवला असून, त्यांच्या निनोज बॅलिसिमा रेस्टॉरंटमध्ये हा १ हजार डॉलरचा पिझ्झा बनला आहे. अत्यंत महागडा असल्याने ठराविक लोकच या पिझ्झाची ऑर्डर करताना दिसत आहेत. २००७ सालापासून निनोज अशा प्रकारचा पिझ्झा तयार करण्यासाठी मेहनत घेत होते. अखेर त्यांची मेहनत फळाला आली.

सुरुवातीला वर्षभर त्यांनी सर्वांत महागडा पिझ्झा कसा तयार करता येईल, याचा अभ्यास सुरू केला. त्यानंतर निर्मितीच्या हालचाली सुरू केल्या. या खास प्रकारच्या पिझ्झामध्ये चार प्रकारच्या पिझ्झाचा एक एक पीस आहे. म्हणजे २५० रुपयांचा एक पीस. निनोज सांगतात की, त्यांचा हा पिझ्झा प्रत्येक व्यक्तीकरिता नाही. पण अनेक असे लोक आहेत की जे इतका खर्च करू शकतात. आर्थिक मंदीच्या आधी ते संपूर्ण आठवड्यात अशा प्रकारचे दोन पिझ्झा विकत होते. पण मंदीदरम्यान विक्री घटून दोन आठवड्यात एक आणि नंतर महिन्यातून एक असा पिझ्झा विकला जाऊ लागला. या परिस्थितीतही निनोज यांनी हिंमत हारली नाही. जगातील सर्वांत महागडा पिझ्झा तयार करण्याचा सन्मान कायम ठेवण्यासाठी हा पिझ्झा बनवत राहिले.



## 100 तास राहिला दफन... तरीही निघाला सहिसलामत!

**तायपेई :** तैवानच्या एका जादूगाराने दावा केला होता, की तो स्वतःला १०० तास जमिनीत पुरून घेईल आणि जीवंत राहील. त्याने हा रेकॉर्ड केला असून, त्याची नोंद गिनीज बुकात झाली आहे.

तायपेईच्या हाशन क्रिएटिव्ह पार्कमध्ये एरिका चेन नावाच्या या ३० वर्षीय जादूगाराने आपल्या या अनोख्या कलेचे प्रदर्शन केले. या वेळी डझनभर पत्रकार आणि शेकडो लोक उपस्थित होते. त्याला जेव्हा १०० तासांनी बाहेर काढण्यात आले तेव्हा त्याचा चेहरा पिवळा पडला होता. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्याच्या शरीरात पाणी कमी झाले तसेच ताप आला आहे, अशी माहिती दिली. पण त्याची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचेही ते म्हणाले. गेल्या रविवारी त्याने स्वतःला रेतीमध्ये गाडून घेतले होते. गुरुवारी त्याला बाहेर काढण्यात आले. या पाच दिवसांत त्याने दोन ट्यूबच्या मदतीने हवा आणि पाणी घेतले. काचेच्या टेलिफोन बुथमध्ये रेती भरून या रेतीत त्याने स्वतःला पुरून घेतले होते. त्यामुळे तो स्पष्टपणे लोकांना दिसायचा. लोकांना जीवंत आहे कळण्यासाठी तो अधूनमधून हात हलवून इशारे करायचा. त्याचे सहकारी काही तासांच्या अंतराने त्याच्या शरीराचे तापमान चेक करत होते. या खतरनाक शोमुळे चेन जागतिक पातळीवरील जादूगार म्हणून ओळखला जाणार आहे.



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७७१७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




### नांदेड येथे ३ ते ५ एप्रिल दरम्यान

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील अस्सल सुवर्ण नाण्याचे पहिल्यांदाच प्रदर्शन

**अर्धापूर (प्रतिनिधी)** –येथील जुन्या नांदेड–मधील ऐतिहासिक नंदगिरी किल्ला येथे दि. ३ एप्रिल ते दि. ५ एप्रिल २०२६ या कालावधीत छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकाचा साक्षीदार असलेल्या शिवकालीन सुवर्ण होन, प्राचीन नाणी व पुरातन शस्त्रे व आयुधे यांचे आगळेवेगळे अभिनव प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

सांगलीचे भूमिपुत्र व येथील अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या संकल्पनेतून नांदेडचे प्राचीन व ऐतिहासिक वैभव असलेल्या नंदगिरी किल्ल्याचे जतन व संवर्धन करणारे नंदगिरीचे किल्लेदार यांची एक मोठी फौज तयार झाली आहे. सदर किल्लेदार व नंदगिरी किल्ला संवर्धन संस्था नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील प्राचीन व ऐतिहासिक वैभव असलेला दुर्मिळ ठेवा यांचे सर्वांना दर्शन व्हावे व जाज्वल्य इतिहास डोळ्या–



समोर उभा राहावा यासाठी या अभिनव प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या राज्याभिषेकाच्या वेळी सोन्याचे होन हे नाणे प्रचलित केले होते. त्यापैकी एक अस्सल सुवर्ण होन (सुवर्ण नाणे) हा ऐतिहासिक अमूल्य ठेवा अशोकसिंघ ठाकूर यांनी संग्रहित केलेला असून त्याचे दर्शन दि. ३ एप्रिल रोजी सर्वांना घडणार आहे आणि महाराष्ट्रात पहिल्यांदा एखाद्या किल्ल्यावर अशा पद्धतीने वैशिष्ट्यपूर्ण प्रदर्शन भरत आहे.

श्री चक्रधर संग्रहालय, निलंगा (लातूर) यांनी संग्रहित केलेल्या इसवी सन पूर्व ६०० पासूनची दुर्मिळ नाणी यांचे प्रदर्शन तसेच महाराष्ट्र व कर्नाटकातील ऐतिहासिक असलेल्या १२ किल्ल्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन दि. ४ एप्रिल रोजी सर्वांना पहावयास मिळणार आहे.

नंदगिरीवर गेल्या तीन वर्षांपासून अशा पद्धतीचे प्रदर्शन भरत आहे. यामध्ये प्रथमच सुवर्ण होनचा समावेश आहे. या प्रदर्शनाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन नंदगिरी किल्ल्याचे किल्लेदार व नंदगिरी किल्ला संवर्धन संस्था, नांदेड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## विविध समस्यांचे निराकरण करा अन्यथा आमरण उपोषण : सत्ताधारी नवनिर्वाचित नगरसेकाचा मनपाला इशारा

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रभाग क्र. २० मधील विविध समस्यांचे निराकरण न केल्यास आमरण उपोषणाचा इशारा सत्ताधारी भाजपाचे नवनिर्वाचित नगरसेवक वैजनाथ देशमुख यांनी एका निवेदनान्वये मनपा आयुक्त यांना दिला आहे.

नवीन नांदेड हडको येथे डॉ. ढगे यांचे दवाखान्याजवळ चौकात जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांचा पुतळा असून, या पुतळ्याच्या परिसरात येथील काही नागरिकांनी अतिक्रमण केले आहे. त्यामुळे दि. १९ एप्रिल २०२६ पूर्वी हे अनधिकृत अतिक्रमण त्वरित काढण्यात यावे व पुतळा परिसराचे सुशोभिकरण व विद्युत रोषणाई करण्यात यावी. जेणे करुन दि. १९ एप्रिल २०२६ रोजी जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती साजरी करण्यासाठी सोईचे होईल.

नांदेड शहरातील साफसफाईचे काम मे. अमृत इंटरप्रायजेस, नांदेड



या कंपनीला कंत्राट देण्यात आले असून, ही कंपनी प्रभाग क्र. २० मध्ये साफसफाईचे काम समाधानकारक करीत नाही. या प्रभागाची पाहणी केली असता, प्रभागात अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढिग साचलेले दिसतात व मागील ५ वर्षांपासून नाली सतत ८०% तुडूंब भरलेली असते. त्यामुळे मे. अमृत इंटरप्रायजेस, नांदेड या कंपनीला ब्लॅक लिस्टमध्ये घेण्यात यावे. एका महिन्याच्या आत या कंपनीस ब्लॅक लिस्टमध्ये घेतले नाही तर मनपा कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

सिडको येथील मनपाच्या दवाखान्यास असलेली जागा कमी पडत आहे, त्यामुळे येथील रुग्णांची गैरसोय होत आहे. हडको बसस्टॉप येथे मनपाचे साईमंगल कार्यालय आहे. हे मंगल कार्यालय सद्यस्थितीत बंद आहे. या मंगल कार्यालयाचा उपयोग कोणत्याही योग्य कामासाठी होत नसून या परिसरातील काही मद्यपान करणारे लोक जागेचा गैरवापर करत आहेत. ही जागा शामनगर कस्तुरबा मातृसेवा केंद्र व हैदरबाग दवाखान्याच्या धर्तीवर सर्व वैद्यकीय सुविधेसह विकसित करुन येथील रुग्णांच्या उपचारासाठी रुग्णालय म्हणून उपलब्ध करुन देवून रुग्णांची सोय करण्यात यावी, सिडको ते उस्मानननगर रोडवर खुल्या जागेत व काही ठिकाणी अतिक्रमण करुन उघड्यावर अनधिकृतपणे मटण विक्री व्यवसाय करण्यात येत आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून, नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो व रस्त्यावर अतिक्रमण केल्यामुळे या रस्त्यावरील रहदारीस अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे अनधिकृत मटण व्यवसाय त्वरीत बंद करण्यात येवून रस्त्यावरील अतिक्रमण तत्काळ काढण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.




**नांदेड** – शुक्रवारीही शहरातील गॅस एजन्सीवर गॅस सिलेंडरसाठी नागरिकांच्या रांगाच रांगा दिसून आल्या. (छाया : करणसिंह बैस, नांदेड)

## जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्ह्यात २८ मार्चच्या सकाळी ६ वाजेपासून ते ११ एप्रिल २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात २८ मार्चच्या सकाळी ६ वाजेपासून ते ११ एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमूद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही. अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील, असे कळविण्यात आले आहे.

## केदारनाथ साठवण तलावावरील चाऱ्या-कालव्याच्या दुरुस्तीची मागणी

**हदगांव (प्रतिनिधी)**– जलसंपदा विभागामार्फत हदगाव तालुक्यातील केदारनाथ साठवन तलावावरील सर्व कालवे, चाऱ्या दुरुस्ती करून सिमेंट कॉंक्रिटकरण करण्यासाठी संबंधित विभागाकडून सविस्तर प्रस्ताव मागून प्रशासकीय मान्यता देत, निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी राज्याचे जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे भारतीय जनता पार्टीचे हदगाव तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी केली आहे.

केदारनाथ येथे मध्यम प्रकारातील साठवण तलाव आहेत, तलावाच्या



माध्यमातून तळेगाव, डोरली, वडगाव, पाथरड, कोळगाव व कंजारा या गावात शेतकऱ्यांना रब्बी हंगामाकरता सिंचनासाठी पाणी मिळत असते, परंतु मागील २५ वर्षांपासून कालव्याची कामे न झाल्यामुळे व सर्व कालवे माती कामाचीच असल्यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होऊन शेतकऱ्यांना पिकाच्या सिंचनासाठी अपुरे पाणी मिळत आहे. शेवटच्या गावात शेतकऱ्यांना आपल्या पिकासाठी पाणी मिळण्यास मोठ्या प्रमाणावर अडचणी येत आहे, त्यामुळे नांदेड येथील जलसंपदा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ आदेश देऊन केदारनाथ तलावावरील कालव्याच्या दुरुस्ती व सिमेंट कॉंक्रिटीकरणकरिता विशेष निधी उपलब्ध करण्यासाठी सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश द्यावेत व सदर कामांकरिता निधी व प्रशासकीय मान्यता द्यावी अशी मागणी राज्याचे जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे भागवत देवसरकर यांनी केली आहे.

## सिद्धार्थ जोंधळे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)**



–येथील डॉ. आंबेडकर नगर परिसरातील रहिवासी तथा नांदेड एसटी महामंडळ विभागात सहायक कारागीर (विजतंत्री) म्हणून कार्यरत असलेले सिद्धार्थ दामोधर जोंधळे यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी तसेच दोन भाऊ व बहिणी असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. २८ मार्च रोजी सकाळी १० वाजता गोवर्धन घाट, नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## नांदेडमध्ये २९ मार्च रोजी 'हिंदू संमेलन'

**नांदेड (प्रतिनिधी)** –हिंदू धर्म, परंपरा, संस्कृती आणि मानवी मूल्यांचे जतन व संवर्धन करण्याच्या उदात्त उद्देशाने नांदेड शहरात 'हिंदू संमेलन' आयोजित करण्यात आले असून, रविवार दि. २९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी हा सोहळा उत्साहात पार पडणार आहे. सामाजिक एकात्मता, धार्मिक जागृती आणि सांस्कृतिक अभियान वृद्धिंगत करण्यासाठी हे संमेलन महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे.

या संमेलनाला अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून, भगवानदादा शेवलीकर (महानुभाव आश्रम, काबरानगर), ह.भ.प. शिवाजी महाराज पावडेवाडीकर, शि.भ.प. ताराबाई बोमनाळे (नायगांव) आणि शि.भ.प. कावेरीताई मुदखेडे (विशालनगर) यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

तसेच अखिल भारतीय धर्म जागरण प्रमुख शरदराव ढोले (मुंबई) हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितांना धर्म, संस्कृती आणि राष्ट्रीय मूल्यांच्या जतनाबाबत सखोल मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाची सुरुवात दुपारी ५:३० वाजता भजन कार्यक्रमाने होणार असून, सायंकाळी ६ वाजता मुख्य संमेलनाला प्रारंभ होईल. नांदेड येथील ए. के. संभाजी मंगल कार्यालय येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. भजन, प्रवचन आणि विचारमंथनाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक विचारांची बीजे पेरण्याचा प्रयत्न या संमेलनातून होणार आहे.

'धर्मो रक्षति रक्षितः' या ब्रीदवाक्याने प्रेरित या उपक्रमाला सकल हिंदू समाजाचा मोठा प्रतिसाद अपेक्षित असून, शिवाजीनगर, लेबर कॉलनी, गणेशनगर, विजयनगर, यशवंतनगर, फरांदेनगर, विशालनगर, यशोविहार आदी परिसरातील नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून संमेलनाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. हे संमेलन सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक जागर आणि मूल्यसंवर्धनाचा एक प्रेरणादायी सोहळा ठरेल, असा विश्वास संयोजकांनी व्यक्त केला आहे.

## गंगाधर जाधव यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)**



–अण्णाभाऊ साठे संघर्ष समिती मराठवाडा विभागाचे माजी अध्यक्ष, आदर्श काळी–पिवळी टॅक्सी संघटनेचे अध्यक्ष गंगाधर गणपतराव जाधव यांचे शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, नातवंडे, भाऊ असा परिवार आहे. शनिवार दि. २८ मार्च रोजी सकाळी १० वाजता त्यांचे राहते घर अण्णाभाऊ साठे चौक, हमालपुरा नांदेड येथून अंत्ययात्रा निघणार असून, त्यांच्या पार्थिवावर गोवर्धनघाट स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## सिडको व हडको येथील श्रीराम मंदिरात राम जन्मोत्सव उत्साहात; अनेक ठिकाणी महाप्रसादाचे वाटप

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– श्रीराम जन्मोत्सव निमित्ताने सिडको व हडको येथील श्रीराम मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले. गुरूवार बाजार सिडको येथे ठाकूर परिवार यांच्या वतीने हभप सौ.पुरी यांनी भजन, कीर्तन व महाप्रसादाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी भाविकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला

रामनवमी निमित्ताने सिडको येथील राममंदिर येथे श्री रामकथा दि. १९ मार्च ते २५ मार्च २६ दरम्यान प्रवचनकार प्रणव जनार्दन पटवारी माजलगांव यांचे व्याख्यान संपन्न झाले. २३ मार्च सकाळी १० वाजता रुद्र स्वाहाकार महायज्ञ (पौराहित्य: सुशिलगुरु), दि. २६ मार्च रोजी



सकाळी १० ते १२ श्री रामजन्म कीर्तन (श्री रामकृष्ण गोविंदराव जामकर) दुपारी १२ वा. श्री रामजन्म उत्सव (पाळणा, महाआरती), सायंकाळी ६ वा. श्री रामाची शोभायात्रा (मंदिर–शिवाजी चौक श्री राममंदिर) येथे काढण्यात आली. २७ मार्च रोजी सकाळी १०.३० ते १२ लक्ष्मीकांत रवंदे यांच्या संगीत विद्यालयाचे सादरीकरण 'रामधुन' (भक्तीसंगीतावर आधारीत कार्यक्रम) दुपारी १२ ते ४ श्री रामाची आरती व महाप्रसाद (भंडारा) आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी आ. आनंदराव पाटील बोंढारकर, दक्षिण शिवसेना जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, दक्षिण शहरप्रमुख तुलजेश यादव, सिडको शहर प्रमुख सुहास पाटील खराणे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी नितीन जळकोटे, माधव घाणेकर, राज आडसकर, आशिष धानोरकर, बबन शिंदे, गणेश भोसकर, मयूर लोलगे, गुरू किरण जोशी व सिडको राम मंदिर पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## प्रा. डॉ. गोविंद चौधरी यांच्या 'एआय' आधारित फॉरेन्सिक ऑडिटिंग डिव्हाइसला भारत सरकारचे पेटंट

### बँकिंग आणि ई-कॉमर्स क्षेत्रातील आर्थिक घोटाळे रोखण्यासाठी होणार मदत

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)** –डिजिटल युगात वाढणारे आर्थिक घोटाळे आणि सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी अर्जापूर येथील पानसरे महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. गोविंद चौधरी (देव) यांनी एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. त्यांनी विकसित केलेल्या 'ऑटोमॅटिक फॉरेन्सिक ऑडिटिंग डिव्हाइस' या नाविन्यपूर्ण संशोधनाला भारत सरकारच्या बौद्धिक संपदा अधिकार अंतर्गत २० मार्च २०२६ रोजी अधिकृत पेटंट प्रदान केले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा (आय) वापर केल्यामुळे डॉ. चौधरी यांचे हे उपकरण मानवी हस्तक्षेपाशिवाय आर्थिक व्यवहारांवर २४ तास लक्ष ठेवणार आहे. यामध्ये 'न्यूरल नेटवर्क' आधारित एआय इंजिनचा वापर करण्यात आला आहे. हे उपकरण संस्थेचे



अकाऊंटिंग सॉफ्टवेअर आणि बाह्य बँकिंग गेटवे यांच्यामध्ये बसवले जाते.

कोणताही व्यवहार पूर्ण होण्यापूर्वीच हे यंत्र त्या व्यवहाराची पडताळणी करते. जर त्यामध्ये काही विसंगती किंवा घोटाळ्याचे संकेत मिळाले तर हे यंत्र तत्काळ 'टॅम्पर प्रुफ' (फेरफार करता न येणारा) फॉरेन्सिक रिपोर्ट तयार करते. यामुळे बँका, ई-कॉमर्स कंपन्या आणि सरकारी संस्थांमधील संभाव्य आर्थिक फसवणूक होण्यापूर्वीच रोखता येणार आहे. १९७२ पासून कार्यरत असलेल्या पानसरे महाविद्यालयाच्या ५४ वर्षांच्या गौरवशाली इतिहासात वाणिज्य विषयात पेटंट मिळवणारे डॉ. गोविंद चौधरी हे पहिलेच प्राध्यापक ठरले आहेत. वाणिज्य विषयातील सिद्धांतांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन त्यांनी हे 'सेल्फ-इव्हॉल्विंग' (स्वतःहून शिकणारे) सिस्टीम तयार केले आहे, जे काळानुसार नवीन प्रकारचे घोटाळेही शोधण्यास सक्षम आहे. या संशोधनाची नोंदणी ३ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आली होती. दरम्यानच्या कालावधीत भारत सरकारने या संशोधनाची तांत्रिक क्षमता ओळखून २० मार्च रोजी यास मंजुरी दिली. हे संशोधन वाणिज्य क्षेत्रातील संशोधकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी एक नवी दिशा देणारे ठरणार आहे.

या जागतिक दर्जाच्या यशाबद्दल हुतात्मा गोविंदराव पानसरे शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि प्राचार्य डॉ. एम. बी. बेलखेडे, कार्यालयीन अधीक्षक राजेश्वर लापशेटवार यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी डॉ. चौधरी यांचे कौतुक केले आहे.

## अल्पवयीन बालिकेला पळवून नेणाऱ्या दोघांना उस्माननगर पोलिसांनी केली अटक; पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** –उस्माननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील व लोहा तालुक्यातील एका अल्पवयीन बालिकेला पळवून नेल्या प्रकरणी उस्माननगर पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. या दोन जणांनी बालिकेवर शारीरिक अत्याचार केला आहे हे उघड झाल्याने या प्रकरणात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित अल्पवयीन बालिका जानेवारी महिन्यात शाळेत गेल्यानंतर अचानक बेपत्ता झाली होती. याप्रकरणी उस्माननगर पोलीस ठाण्यात दि. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे आणि तांत्रिक मदतीने शोध मोहीम सुरू केली.

तपासादरम्यान संबंधित बालिका गोवा येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.



पोलिसांचे पथक तत्काळ गोव्याकडे रवाना झाले; मात्र आरोपींनी तेथून ठिकाण बदलले असल्याचे निष्पन्न झाले. पुढील तपासात आरोपी मालेगाव एमआयडीसी, तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक येथे असल्याचे समोर आले. पोलिसांनी तत्पर कारवाई करत दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेले आरोपी शिवाजी रामकिशन बिचेवाड (वय २० रा. लोहा, जि. नांदेड) आणि आकाश आनंद बिचेवाड (वय १९ रा. वडेपुरी, ता. लोहा, जि. नांदेड) यांचा समावेश आहे. ही कारवाई पोलीस उपाधीक्षक डॉ. अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार, पोलीस उपनिरीक्षक गजानन गाडेकर यांच्या पथकाने केली.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com